**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती सभा**
**कार्यपत्रिका क्र.४३, दि.५/१/२०१६**
**सभा क्र.६१,दि.५/१/२०१६ चा वृत्तांत**

नगरसचिव
विषय क्र. १९५६ ते १९८३
दा. वि.क्र. १९८४ ते २०२३
ठराव क्र. १९५६ ते २०२३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ५/१/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

३. मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत
४. मा.सौ.ओरसे शारदा शंकर
५. मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम
६. मा.अॅड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते
८. मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद
९. मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश
११. मा.तुपेरे राहूल बापू
१२. मा.बागवे अविनाश रमेश
१३. मा.सौ.बाबर आरती साईनाथ
१४. मा. राणे अनिल बाबूराव
१५. मा.सौ.लोणकर नंदा नारायण
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :-

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
३. मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. श्री.सुनिल पारखी, नगरसचिव
६. मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख)
७. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (सामान्य प्रशासन)
८. मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक)
९. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख
१०. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
११. मा. विलास कानडे, उपायुक्त स्थानिक संस्था कर
१२. मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता
१३. मा. राजेंद्र राऊत, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
१४. मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
१५. मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी
१६. मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक
१७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
१८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
१९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
२०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
२१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
२२. मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४)
२३. मा.संदीप खादंवे, कार्य.अभि.(भवन)
२४. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
२५. मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प)
२६. मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक)
२७. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
२८. मा.मदन आढारी, अधी.अभि.(पा.पु.)
२९. मा.धारूरकर, (ऑपरेशनल मॅनेजर, पी.एम.पी.एम.एल.)

प्रथम सभा क्र. ७९,दि.१८/०३/१५ चा वृत्तांत कायम करावेत असे सर्वानुमते ठरले व त्यानंतर मा.अध्यक्षा यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या.

# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.३३, दि.५/१/२०१६**

**सभा क्र.,दि.५/१/१६ चा वृत्तांत**

मा.अध्यक्षा–प्रथम श्रध्दाजंली वाहू या.

**पठाणकोट येथील दशहतवादी हल्ल्यामध्ये भारतीय जवान शहीद झाले, नैऋत्य भारतामध्ये झालेल्या भूकंपामध्ये काही नागरीकांचे निधन झाले यांना श्रध्दाजंली वाहण्यासाठी आपण सर्वांनी उभे रहावे, ही विनंती.**

मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी. दाखलचे विषय सुरू करावेत.

नगरसचिव–दाखल विषय सुरू करीत आहोत.

## दाखल विषय

**दाखल विषय क्रमांक :– १९८४/ठराव क्र१९८४**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव साजरा करणेसाठी र.रुपये २५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९८५/ठराव क्र.१९८५**

प्रभाग क्र. २९ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये १ कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे आणि मा.सौ.नंदा लोणकर यांचे १ कोटी रू.चे वर्गीकरण

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९८६/ठराव क्र.१९८६**

प्रभाग क्र. ६२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये ३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.संगिता ठोसर यांचे दि. ३१/१२/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

नगरसचिव–या सदरचा विषय दाखल करून मान्य करणेस कोणाचा विरोध आहे का?

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :–१९८७/ठराव क्र.१९८७**

प्रभाग क्र. ३३ अ मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत, मा.अॅड्.योगेश मोकाटे यांचे दि. ३१/१२/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

नगरसचिव–या सदरचा विषय दाखल करून मान्य करणेस कोणाचा विरोध आहे का?

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९८८/ठराव क्र.१९८८**

बजेट कोड CE19A164 कोथरुड मतदारसंघातील विविध ठिकाणचे रस्ते विकसित करणेसाठी र.रुपये १ कोटी ६० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.प्रा.सौ.मेधा कुलकर्णी, आमदार यांचे दि. २/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते त्यांच्या कोथरूड मतदार संघातीलच आहे.

नगरसचिव–या सदरचा विषय दाखल करून मान्य करणेस कोणाचा विरोध आहे का?

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९८९/ठराव क्र.१९८९**

प्रभाग क्र. ३७ ब मध्ये नारायण पेठ परिसरात यु.टी.डब्ल्यू.टी. पध्दतीने रस्ते करणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रुपये ८० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि. ४/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

नगरसचिव–या सदरचा विषय दाखल करून मान्य करणेस कोणाचा विरोध आहे का?

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९०/ठराव क्र.१९९०**

प्रभाग क्र. ७२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.दिनेश धाडवे व मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९१/ठराव क्र.१९९१**

मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १९३७ दि. २९/१२/२०१५ चा फेरविचार करण्यात यावा. (वाघोली प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्णवेळ कार्यान्वित ठेवणे व पाण्याचे वाटप करणेबाबत)

मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयाला आमचा विरोध आहे.

नगरसचिव–हा विषय दाखल करून घेण्यास विरोध असल्यामुळे मी मतदान घेत आहे.

अनुकूल–७

प्रतिकूल–३

नगरसचिव–हा विषय बहुमताने दाखल करण्यात आला. आता हा विषय मान्य करणेस कोणाचा विरोध आहे का?

मा.सौ.मुक्ता टिळक–होय.

नगरसचिव–हा विषय मान्य करणेस विरोध असल्यामुळे मी मतदान घेत आहे.

**अनुकूल–८**

**प्रतिकूल–२**

**निर्णय–सदरचा विषय बहुमताने दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९२/ठराव क्र.१९९२**

मा.अविनाश बागवे, मा.सौ.मुक्ता टिळक व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४७ दि. २९/१२/२०१५ चा फेरविचार करण्यात यावा. ( पुणे म.न.पा. चे स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, कात्रज येथील सर्पोद्यान व प्राणी अनाथालय या विभागाचे देखभालीचे कामकाज भारतीय सर्पविज्ञान संस्थेस देणेबाबत)

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–मूळ विषय मान्य करावा.

**निर्णय–सदर फेरविचाराचा प्रस्ताव सर्वानुमते दाखल करून मूळ विषयपत्र मान्य करण्यात आले.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९३/ठराव क्र.१९९३**

बॅ.नाथ पै चौक विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार दि रायकॉन कन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६६,०२,३९८/– पेक्षा ७.८२% कमी) अधिक टेंडर अटी/शर्तीमध्ये नमुद भाववाढ सुत्रानुसार निर्धारीत होणारी वाढ अथवा घट ही स्विकृत होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेणेसाठी व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मुअ(प्र)/८५६ दि. १/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९४/ठराव क्र.१९९४**

पेशवे पथ व टिळक रस्त्याला जोड रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,९८६/– पेक्षा ८.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३१,१२,५२९=२५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मुअ(पथ)/८५७ दि. १/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९५/ठराव क्र.१९९५**

वॉर्ड क्र. ८ आपले घर शाळेच्या खोल्या बांधणे व उर्वरीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सलिम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३७,५४,४३३/– पेक्षा २२.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २९,०९,३१०=१३ रकमेपर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार

काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/भवन/८५९ दि. २/१/२०१६ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९६/ठराव क्र.१९९६**

प्रभाग क्र. १७ मधील रस्ते काँक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,९९,९९,७७५/– पेक्षा २४.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,२७,६९,८२९=२२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८६० दि. २/१/२०१६ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९७/ठराव क्र.१९९७**

प्रभाग क्र. ८ सोमेश्वरवाडी ग्राम संस्कृती उद्यान येथे हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मनिष शिंदे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,३०,८१३=३० पेक्षा २३.०४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३७,९४,७५३=९१ पर्यंत काम करून घेणेस व तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे क्र. मआ/उद्यान/८६२ दि. २/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९८/ठराव क्र.१९९८**

प्रभाग क्र. ३८ ब नागझरी नाल्याची सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.पी.देवकर यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५४,९६,२७९/– पेक्षा २७.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४०,११,७३४=०४ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मलनि/८६६ दि. २/१/२०१६ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– १९९९/ठराव क्र.१९९९**

प्रभाग क्र. ७३ मधील बालाजी नगर परिसरामध्ये रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,६४,५९८/– पेक्षा १८.४२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,८६,९५९=०५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८६९ दि. ४/१/२०१६ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०००/ठराव क्र.२०००**

कार्यकारी अभियंता क्र. १ पथ विभाग यांचे कार्यक्षेत्रातील भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय यांचे विविध केबल कंपन्या व पुणे महानगरपालिकेमार्फत केलेल्या खोदाईचे रिईनस्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,९९२/– पेक्षा ७.८६३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९२,१३,६९२=६२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८७० दि. ४/१/२०१६ चे पत्र.
मा.अनिल राणे–याबाबतची माहिती द्यावी.
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(पथ)–यामध्ये फूटपाथ खोदाई केलेल्या ठिकाणी कॉक्रीटीकरण केले जाते.
मा.अनिल राणे–गेल्यावेळी केलेली खोदाई तशीच आहे, त्यांनी काम केलेले नाही.
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(पथ)–त्याठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक्स बसवून देऊ.

मा.अनिल राणे–ते काम कधी करणार आहात?
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(पथ)–ते रिईन्स्टेटमेंट मधून करून घेऊ.
मा.महा.आयुक्त–पुढील वर्षापासून ड्रेनेजच्या साईटसासाठी रोडची खोदाई न करता स्ट्रेंचिंगने होईल आणि पुढील वर्षापासून त्या यंत्रणेमार्फत खोदाईच्या कामाची पॉलिसी करणार आहोत.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–ड्रेनेजचे चेंबर आर.सी.सी.मध्ये करावेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००१/ठराव क्र.२००१**

पुणे स्टेशन समोरील कै. तुकाराम शेठ शिंदे वाहनतळ बेसमेंट, दुसरा, तिसरा मजला चारचाकी वाहनांसाठी ५ वर्षे कालावधीसाठी मक्ता पध्दतीने देणेकामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात जास्त दर देणारे अ.क्र. १ चे निविदाधारक शुभांगी एंटरप्रायजेस १८५, महात्मा गांधी मार्ग, कॅम्प, पुणे १ यांनी देवू केलेली वार्षिक मक्ता र.रुपये ३७,१७,५५५/– ही महानगरपालिका निर्धारीत वार्षिक मक्ता र.रुपये २९,०७,२२५/– या रकमेपेक्षा रुपये ८,१०,३३०/– ने अधिक असल्याने सदरच्या वाहनतळाची जागा शुभांगी एंटरप्रायजेस, १८५, महात्मा गांधी मार्ग, कॅम्प, पुणे १ यांना वार्षिक मक्ता र.रू. ३७,१७,५५५/– प्रमाणे मक्ता पध्दतीने ताबा दिनांकापासुन ५ वर्ष कालावधीसाठी निविदेतील अटी व शर्तीनुसार कराराने देणेस व त्यांचेशी करारानामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/माव्य/८७२ दि. ४/१/२०१६ चे पत्र.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय दोन महिने पुढे घ्यावा.
नगरसचिव–हा विषय दाखल करण्यास कोणाचा विरोध आहे का?
मा.सौ.मुक्ता टिळक–होय, आमचा विरोध आहे.
नगरसचिव–हा विषय दाखल करण्यासाठी विरोध झाल्यामुळे मतदान घेत आहोत.
मा.सौ.मुक्ता टिळक–मग हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.
मा.अध्यक्षा–मतदान घ्यावे.
मा.सौ.मुक्ता टिळक–विषय वाचून दाखववा.
नगरसचिव यांनी यावेळी संपूर्ण विषय वाचून दाखविला.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मा.विरोधी पक्षनेत्यांचा आग्रह आहे की, हे त्यांच्या प्रभागात आहे आणि हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय बाजूला ठेवावा.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ठीक आहे, काही अडचण नाही.
नगरसचिव–सदरचा विषय दाखल करणेस विरोध झाल्यामुळे मी या विषयावर मतदान घेतो.
अनुकूल –१३
प्रतिकूल–३
**नगरसचिव–सदरचा विषय बहुमताने दाखल करण्यात येत आहे.** हा विषय मान्य करण्यास कोणाचा विरोध आहे का?
मा.सौ.मुक्ता टिळक–होय, आमचा विरोध आहे.
नगरसचिव–हा विषय मान्य करण्यास विरोध झाल्यामुळे मी या विषयावर मतदान घेतो.
अनुकूल –१३
प्रतिकूल–३
**निर्णय–सदरचा विषय बहुमताने मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००२/ठराव क्र.२००२**

पुणे महानगरपालिका हद्दीतील हरित इमारती (Green Building) साठीचे हरित गुणांकन (Green Rating) मे.इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल या संस्थेकडून मनपा हद्दीतील बांधकाम पर्यावरणपुरक होणेसाठी प्रस्तावित सवलत ही पुणे मनपाच्या महसूल विभागाशी संबंधित असल्यामुळे खालील बाब क्र. १ ते ३ अवलोकन करुन त्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/शअ/८७४ दि. ४/१/२०१६ चे पत्र.

१.हरित इमारतीचे गुणांकन करणेसाठी IGBC या संस्थेची नेमणूक करणेस.

२.हरित इमारतीच्या प्रकल्पाला IGBC कडून पूर्व प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करणेस.

३.ग्रीन बिल्डिंग, ग्रीन रेटींग प्रमाणे अशा प्रस्तावातील इमारतीमधील जिना मार्गिका(पॅसेज), बाल्कनी, लिफ्ट, लिफ्ट लॉबी इ. चे क्षेत्रास प्रिमियममध्ये सिल्व्हर, गोल्ड आणि प्लॅटिनम स्टार रेटिंगनुसार अनुक्रमे ५%, १०% व १५% सवलत देणेस.

मा.महा.आयुक्त–महापालिका हद्दीमध्ये उर्जा संवर्धन करण्याच्या दृष्टीकोनातून उर्जा स्तोत्रांचा विकास करण्याकरीता उर्जा विकसीत इमारती होतील याबाबत ठराव केला होता आणि मा.स्थायी समितीने गृह या संस्थेस मंजूरी दिली होती आणि त्यानंतर त्यांनी हे नव्याने करावे असे नमूद केले आहे. सदरचे काम गृह संस्था यांचे प्रमाणेच आय.जी.बी.सी. या संस्थेकडूनही करून घेण्यात येणार आहे.

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता– मा.यामध्ये डेव्हलपर्स त्यांना मोबदला देणार आहेत.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करा.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.
मा.महा.आयुक्त–हे राष्ट्रीय स्तरावर करायचे ठरविले आहे.
मा.अध्यक्षा–त्यांना या मधून काहीतरी उत्पन्न मिळणार आहे त्यांनी महापालिकेला सुध्दा काहीतरी दिले पाहिजे. आपण त्यांना अधिकार दिले आहेत.
मा.अविनाश बागवे–यामध्ये आपल्या प्राधिकाऱ्यांचे मॉनिटरींग असले पाहिजे.
मा.सौ.मुक्ता टिळक– यामुळे कार्पोरेशनचे काम कमी होणार आहे. यामध्ये फायनल ॲथारिटी तुम्ही असावे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००३/ठराव क्र.२००३**

१४ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१६ याकरिता र.रुपये ३,००,०००/– (र.रुपये तीन लाख फक्त) देणगी विभागाकडील सन २०१५ –२०१६ या अर्थशिर्षकावरील रकमेतून वर्ग करणेस व देणगी देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/उआ(साप्र)/८७५ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–आपण दरवर्षी देतो आणि ते फक्त आपल्याला उदघाटनापुरतेच बोलवितात.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते– आपली प्रथा, परंपरा आहे.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००४/ठराव क्र.२००४**

प्रभाग क्र. ५९ शितळादेवी चौक ते गंज पेठ पोलीस चौकी रस्ता मिलिंग करून डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२७,३५,१४४/– पेक्षा २.००% कमी सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु. २६,८०,४४१=१२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८७६ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००५/ठराव क्र.२००५**

लक्ष्मीनगर अंतर्गत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी.करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ज्ञानेश निंबाळकर यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,४५,९७३/– पेक्षा १८.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३६,०१,६८२=७२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८७७ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००६/ठराव क्र.२००६**

मुंढवा, केशवनगर हद्दी पर्यंत रस्त्याचे डांबरी कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,०५,१९,९७९/– पेक्षा १५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,७४,४१,९८२=१५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८७८ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००७/ठराव क्र.२००७**

सिंहगड रस्ता ते जनता वसाहत कॅनॉल पर्यंत (पाण्याची टाकी ई.एस.आर.लगत रस्ता) रिईनस्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जॅगसन्स बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२७,३५,९७४/– पेक्षा १.००% कमी (सुधारित)) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,०८,६१४=२६ पर्यंत काम करून घेणेस

अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८७९ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००८/ठराव क्र.२००८**

धनकवडी तीन हत्ती चौक ते तळजाई पठार गणपती मंदीर रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जॅगसन्स बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,३३६/– पेक्षा १.००% कमी) (सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३३,८५,१४२=६४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८० दि. ५/१/२०१६ चे पत्र.
उपनगरसचिव–डांबरीकरणाचे टेंडर
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २००९/ठराव क्र.२००९**

प्रभाग क्र. ६४ अ, मध्ये विविध ठिकाणी व विद्यासागर कॉलनी, लुल्लानगर गिरणी पार्क एकोपा सोसायटी व परिसरामध्ये रस्ते मिलींग करून डांबरीकरण करून विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के. येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५०,००,०००/– पेक्षा १४.९८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,५१,०००/– पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८१ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१०/ठराव क्र.२०१०**

सारसबाग चौक ते धायरी फाटा (सिंहगड रोड) सर्व्हिस रस्ता पुर्नडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृष्णाई इन्फास्ट्रक्चर प्रा. ली. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,८७,९८०/– पेक्षा १.०६% कमी) (सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.४७,३७,२२७=४१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८२ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–एवढा मोठा रस्ता इतक्या पैशात कसा होणार आहे?
मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि(भवन)–हे मेंटेनेन्सचे आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०११/ठराव क्र.२०११**

वनशीव वस्ती धनकवडी स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे (वनशीव वस्ती ते तिरूपतीनगर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जॅगसन्स बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,३३६/– पेक्षा १.% कमी) (सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,८५,१४२=६४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८३ दि. ५/१/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१२ /ठराव क्र.२०१२**

प्रभाग क्र. ३४ अ मधील सर्वत्र सोसायटी, ईशदान सोसायटी, आयडीयल कॉलनी, मयुर कॉलनी ,मृत्युंजय सासोयटी येथील अंतर्गत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीले कॉंक्रिटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,०४,९९,७६०/– पेक्षा २४.२६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,३१,००,५१८=२२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८४ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१३/ठराव क्र.२०१३**

प्रभाग क्र. ६० नेहरु रस्ता सोनावणे हॉस्पीटल ते सेवन लव्ह चौक रस्ता विकसित आणि दुभाजक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. द रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५४,४६,४३२/– पेक्षा १२.९२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४७,४२,७५२=९८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८६ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१४/ठराव क्र.२०१४**

पुणे शहरात प्रवेश करण्याचा(एन्ट्री पॉईन्ट) रस्त्याच्या विविध ठिकाणी स्वागत भिंत उभारण्यासाठी विकास व सुशोभिकरणाची कामे करणे (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. निखील कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९६,०८,५६५/– पेक्षा % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२४,९४,०००/– पर्यंत काम करून घेणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८८७ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१५/ठराव क्र.२०१५**

सन २०१५–२०१६ या आर्थिक वर्षातील मिळकतकराची नोटीस व वॉरंट वाटपाबाबत खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. अतिमआ/टीजीओ/८८८, दि.५/१/२०१६ चे पत्र.

१. मा.प्रवर अधिक्षक, डाकघर पुणे शहर, पुणे यांचे ईमेल पत्र दि.७/१२/२०१५ व डेप्युटी जनरल मॅनेजर गव्हर्मेंट ऑफ इंडीया पोस्ट डिपार्टमेंट नवी दिल्ली यांचे ऑफीस मेमोरेंडम दि.१६/०३/२०१५ विचारात घेता सन २०१५–१६ मधील सुमारे ३ लाख थकबाकी धारकांना नोटीस, वॉरंट, सूचना पाठविणेसाठी पोस्ट विभागास प्रतीनोटीस वॉरंट रु. ३.२० याप्रमाणे रक्कम अदा करणेस व वेळोवेळी पोस्टाच्या दरात बदल झाल्यास त्यानुसार त्यांचे सुधारीत दराप्रमाणे रक्कम अदा करणेचे अधिकार मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांना देणेस.
२. प्रस्तुत बाबत येणारा खर्च करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील सन २०१५–१६ चे अंदाजपत्रकातील ३– संकीर्ण आरई११जी१०३ या अर्थशिर्षकामधुन अंदाजे र.रु.९.६० लक्ष (अक्षरी–नउ लाख साठ हजार) एवढी रक्कम ॲडव्हान्स पोस्ट विभागास अदा करणेस.

सन २०१५–१६ चे मिळकत कर नोटीस

मा.बापूराव कर्णे गुरूजी–या विषयाची माहिती द्यावी.

मा.मापारी,(कर आकारणी प्रमुख)–भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्या दरामध्ये ३० पैशांनी वाढ केली आहे. मागील वर्षी हा दर ४० पैसे इतका होता आणि आता आपल्याला ३ लाख नोटीसा पाठवायच्या आहेत. त्यामुळे यामध्ये ३० पैशांनी वाढ झाली आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.

नगरसचिव–या विषयाला कोणाचा विरोध आहे का?

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१६/ठराव क्र.२०१६**

मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४८ दि. २९/१२/२०१५ चा फेरविचार करण्यात यावा.

(प्रभाग क्र. ३१ अ वारजे गावठाण इंडस्ट्रिअल इस्टेट, हनुमान चौक, दत्तनगर, रामनगर, खानवस्ती दरम्यान कॅनॉल रोडवरून मुख्य मलवाहिनी विकसित करणे (भाग – १) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर ॲन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,७९,६६,०९५=४१ पेक्षा ३५.११११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,८१,४६,८९१=६८ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्यात यावी.)

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१७/ठराव क्र.२०१७**

प्रभाग क्र. १७ ब यशवंतनगर, नेताजीनगर, भाटनगर भागात ८ इंची पाण्याची लाईन टाकून पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणे व खोदाईचे ठिकाणी काँक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.सुनिल वीर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३५,२४,३८५/– पेक्षा १२.६१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३०,७९,९६०=०५ कमी/अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/लपापु/८९२ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :–२०१८/ठराव क्र.२०१८**

प्रभाग क्र. १७ ब कल्याणीनगर भागातील पाणी पुरवठा सुधारणेसाठी विविध ठिकाणी पाण्याच्या लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,४९,०१५=२५ पेक्षा १८.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,५१,४५१=३६ कमी/अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/लपापु/८९३ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०१९/ठराव क्र.२०१९**

वारजे कर्वेनगर कार्यालय अंतर्गत पडीक हद्दीची ठेकेदारी पध्दतीने स्वच्छता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिवानी एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७५,९९,६२८=८० पेक्षा १४% जास्त तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ८६,६३,५७६=८३ पर्यंत झाली असली तरी सदर काम पुर्वगणनपत्रक र.रु.७५,९९,६२८=८० पर्यंत त्यांचे दुरुस्त टेंडर दराने काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/उआ(परिमंडळ–१)/८९४ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०२० /ठराव क्र.२०२०**

सन २०१५–२०१६ महापौर चषक विशेष विद्यार्थी क्रीडा स्पर्धा बाल कल्याण संस्था, पुणे यांचे मार्फत आयोजनास व त्या प्रित्यर्थ होणाऱ्या र.रू. १४,९२,५००/–(अक्षरी रक्कम रुपये चौदा लाख ब्यान्नव हजार पाचशे फक्त) पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/उआ(समाजकल्याण क्रिडा)/८९५ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०२१ / ठराव क्र.२०२१**

सन २०१५ –२०१६ महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा आयोजनाकरीता खालील १ ते ४ बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/उआ(समाजकल्याण)क्रिडा/८९६ दि. ५/१/२०१६ चे पत्र.

१.स्पर्धा आयोजनास व त्या प्रित्यर्थ होणाऱ्या खर्चास (र.रू. १३,५३,०००/– पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास)

२.स्पर्धेत विजेयी होणाऱ्या खेळांडूचे/संघाचे नावे बक्षिसे धनादेशाद्वारे अदा करणेस (र.रू. १५,८६,९००/– पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास)

३.मे.वेदपाठक क्रिएशन यांचे ट्रॉफीज, मेडल, सन्मानचिन्ह यांचे बिल आदा करणेस. (र.रू. १०,००,०००/– पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास)

४.मे.टाईम व्हिजन यांचे फोटो व व्हिडिओ शुटिंग चे बिल आदा करणेस. (र.रू. ५,००,०००/– पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०२२/ठराव क्र.२०२२**

मा.महापौर, मा.उप महापौर, मा.विरोधी पक्षनेते,मा.गटनेते, आर.पी.आय., मा.गटनेते, शिवसेना, यांचे कार्यालयात तसेच स्थायी समिती सभा व शहरसुधारणा समिती सभाप्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यांत आले होते. त्याप्रित्यर्थ संबंधित बिलधारकाने बिले सादर केली असून संबंधित अर्थशिर्षकावर बिले खर्ची टाकून संबंधितास बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ५४२९ दि. ४/१/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २०२३/ठराव क्र.२०२३**

मा. ना. श्री. नितीन गडकरी, केंदीय मंत्री, रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्यातर्फे मा.ना. श्री. गिरीश बापट ,पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण,अन्न व औषध प्रशासन, ससंदीय कार्य यांचेबरोबर दिनांक ९ सप्टेंबर २०१५ रोजी नवी दिल्ली येथे पुणे मेट्रो व पुणे शहरातील वाहुतक संबधीत प्रलंबित विषयांवर चर्चा करणेसाठी बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीसाठी मा. महापौर यांना निमंत्रित करण्यात आले असून सदर बैठकीस उपस्थित रहाणेसाठी पुणे ते दिल्ली व दिल्ली ते पुणे विमान प्रवासाची तिकिटे मे.हसमुख ट्रॅव्हल्स एजंट प्रा. लि. पुणे यांचे मार्फत आरक्षित करणेत आली असून त्याप्रित्यर्थ मे. हसमुख ट्रव्हल्स एजंट प्रा. लि., पुणे यांनी खालीलप्रमाणे बिल सादर केले आहे. सदरचे बिल प्रवास खर्च खात्यातून संबंधितांस अदा करणेची व्यवस्था करणेत यावी, असे मा. महापौर यांनी त्यांचे संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये कळविले आहे.

| बिल क्र. | दिनांक | प्रवास | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| ७००७६५३<br>८/९/२०१५ | ८/९/२०१५ | पुणे– दिल्ली | ५,५३१/– |
| ७०१२८६८<br>८/९/२०१५ | ९/९/२०१५ | दिल्ली – पुणे | ५,५२७/– |
| एकूण रक्कम रूपये | | | ११,०५८/– |

मा. महापौर, पुणे यांचे नवी दिल्ली येथे जाणे–येणेचे प्रवासाचे एकुण रक्कम रुपये ११,०५८/–(अक्षरी रक्कम रुपये अकरा हजार अठ्ठावन्न फक्त) चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांस बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ५३७० दि. १/१/२०१६ चे पत्र.

सन २०१५ – २०१६ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. महानगरपालिका व स्थायी समिती, १. नगरसचिव यांचे कार्यालय, ४. प्रवास खर्च (RE11A 104) मान्य तरतूद रक्कम रूपये १६,००,०००/–

मा.सौ.मुक्ता टिळक–हे बिल कोणत्या प्रवासाचे आहे?

नगरसचिव– बैठकीनिमित्त, पुणे ते दिल्ली या विमान प्रवास खर्चाचे बिल आहे.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.**

**विषय–**

प्रभाग क्र.२१ कोरेगाव पार्क लेन नं.५ येथे अस्तित्वातील १२ मीटरचा रस्ता कलम २१० (१)(ब) अन्वये रस्ता दोन्ही बाजूने दोन दोन मीटर रूंद करणेबाबत मा.बाबू वागस्कर व मा.सौ.वनिता वागस्कर यांचे दि.३०/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र.१२५७ दि.१३/१०/२०१५ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/भूसंपादन/८७१ दि.४/१/२०१६ दि.४/१/१६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– **हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.**

मा.सौ.मुक्ता टिळक–कोणकोणते विषय दाखल झाले? याबाबत माहिती द्यावी.

नगरसचिव–मा.सभागृहनेते यांचे र.रू.१ कोटी चे वर्गीकरण आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव र.रू.२५ लाख हे दोन्ही विषय दाखल मान्य झाले आहेत आणि तिसरा विषय प्र.क्र.३१ येथील एक विषय कार्यपत्रिकेवर घेतला आहे.

**विषय–**

प्रभाग क्र.३० ब मध्ये विविध कामांसाठी अखर्चीत रक्कमेतून २.५० कोटी रू.चे वर्गीकरण करण्यात यावे, याबाबत मा.सचिन दोडके यांचे दि. ३१/१२/२०१५ चे पत्र.

नगरसचिव–हे अखर्चित रक्कमेतून आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–अखर्चित मधील रक्कमेचे वर्गीकरण कसे? याबाबत माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– अखर्चित बाबतचा विषय मा.गटनेत्यांबरोबर आणि १६ तारखेच्या स्थायी समिती मध्ये घेणार आहोत. या विषयाबद्दल सर्वांसह बोलून निर्णय घेणार आहोत.**सदरचा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.**

**विषय–**

प्रभाग क्र.३० ब येथे छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट स्टेडियम उभारणेसाठी र.रू. २ कोटीचे वर्गीकरण करण्यात यावे, याबाबत मा.दिपक मानकर, मा.सचिन दोडके यांचे दि.३१/१२/२०१६ चे पत्र.

नगरसचिव–हे खात्याचे बजेट आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–याबाबत एकत्रित निर्णय करावा.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–आपण याबाबत मिटींग आयोजित करावी.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–या विषयावर आपण मिटींग घेऊ.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण हा विषय मान्य केलेला आहे.
**मा.शंकर केमसे, सभागृहनेते–सदरचा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.**
**विषय–**

पुणे महापालिकेच्या विविध जलकेंद्रासाठी द्रवरूप तुरटी ग्रेड ३/V [ IS 299: 2012 नुसार ] पुरविण्याचे मान्य टेंडर परिमाणापेक्षा ५० टक्के जादा परिमाण खरेदी करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पापू/८९० दि.५/१/१६ चे पत्र.

मा.महा.आयुक्त–दि.११ जानेवारी ते दि.११ मार्च पर्यंत करणार आहोत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये काटकसर करू नये
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–**हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.**
**विषय–**

पुणे मनपा कोंढवा येथील कत्तलखाना कार्यान्वित करणे (MAKING THE EXISTING MECHANICAL SLAUGHTER HOUSE OPERNATIONAL) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्संपैकी ठेकेदार मे.डॉ.फ्रोएब इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रू.३,३६,८८,१००/– पर्यंत (मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ट अ मधील सर्व आयटेम्स) मशिनरी पुरविणे, ट्रान्सपोर्टेशन, इंनस्टॉलेशन, लेबर चार्ज, सर्व करांसह, सेवक प्रशिक्षण व वार्षिक comprehensive maintainance सह काम करून घेणेस, त्याकरिता करारनामा करण्यास, बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/८८९ दि.५/१/१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–**हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.**

## कार्यपत्रिकेवरील विषय
## घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र.१९५६/ठराव क्र.१९५६

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे डिसेंबर २०१५ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/२९०८ दि. ३०/१२/२०१५ चे पत्र.

मा.अनिल राणे–स्वच्छ संस्थेबरोबर करारानामा कधी झाला? याबाबतची माहिती द्यावी.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–१ तारखेला हा करार रजिस्टर झाला.
मा.अनिल राणे–आपण स्वच्छ संस्थेचे विषय घाईघाईने करीत आहात. एवढी घाई करण्याची गरज आहे का? तीन महिन्यांनी हे ॲग्रीमेंट झाले आणि त्यांचे काम सुरू होत नाही.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–१ जानेवारीला ॲग्रीमेंट झाले. प्रत्येक वॉर्डनिहाय माहिती मागवून प्लॅनिंग केले आहे. हा रजिस्ट्रेशनचा विषय आहे.
मा.अनिल राणे–याबाबत त्यांच्याशी डिसकस झाले नाही का? नवीन प्रस्तावात टर्म ॲण्ड कंडिशन्स नव्हत्या का? तुम्ही इतक्या घाईघाईत बदल करीत आहात. तुम्ही स्वत: प्रशासन म्हणून तीन तीन महिने लांबविता आणि त्यातून कचऱ्याचा प्रश्न निर्माण होत नाही का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–ही वस्तुस्थिती आहे, गरज आहे. त्यांनी न केलेली कामे सुध्दा केली असल्याचे दाखवून मान्यता घेतली. रॅकपिकर्स शहरातील कचरा गोळा करतात म्हणून त्यांना १ हजार रू.द्यावेत असे, मा.स्थायी समिती आणि मा.मुख्यसभेने सुध्दा मान्य केले परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. आता आर्थिक वर्ष संपत आले फक्त तीनच महिने बाकी राहिले आहेत.
मा.अनिल राणे–ते आपण सांगितलेली कामे करीत नाहीत त्यांना काम करण्यासाठी काही अडचण आहे का?
मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्षा, हे मान्य करा, ॲग्रीमेंट वेळेवर झाले पाहिजे. प्रभाग मिटींग मध्ये चर्चा करून बिलामध्ये मान्य करीत आहोत.
मा.अध्यक्षा–मागील ३ महिन्यांचे देणार आहात का?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–तसे नाही, मागील कराररनामा प्रमाणे देणार आहोत.
मा.अध्यक्षा–स्वच्छ संस्थेबरोबर केलेला कराररनामा आणि त्यांचे काम कशा पध्दतीने राहणार आहे? याबाबतची माहिती द्यावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–शहरात ठिकठिकाणी कचरा साठला आहे त्याबद्दल नागरीकांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत आहेत की, वेळेवर कचरा उचलला जात नाही, याबाबत कोणते नियोजन केले आहे?
मा.मुकारी आलगुडे–स्वच्छ संस्थेचे लोक कुठे आहेत?
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–वॉर्ड ऑफिस आणि मुख्य खाते यांच्या सोबत मिटींग्ज घेऊन ४५ ठिकाणी शॉर्टींग शेड केले आहे, कचरा श्रेडींग करीत आहोत आजमितीला ५० ते ६० टन कचरा वेगवेगळया ठिकाणांवरून तिथे पाठविला जातो आणि त्यानंतर गाडी लावून, आता हेवी व्हेईकल्सचे टेंडर झालेले आहे आणि त्या गाड्या सुध्दा आल्या आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–आता सुध्दा रस्त्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण आणि रस्त्यावरील कचऱ्याचे प्रमाण कमी झालेले नाही.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–प्रभागात लोक नेमून, पर्यायी व्यवस्था बकेटस ठेवण्याचे नियोजन केले आहे आणि नवीन गाड्या मार्फत कचऱ्यांचे ढीग उचलण्याची व्यवस्था करतो.

मा.अविनाश बागवे–टेंडर मान्य केले आहे त्यांना काम करण्यास सांगावे अन्यथा आम्ही जागा बदल करण्याबाबतचे पत्र देऊ.
मा.महा.आयुक्त–सदरचे काम झाले आहे का?
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–तेथे बऱ्यापैकी काम झाले आहे.
मा.महा.आयुक्त–त्याठिकाणी काम चालू आहे आणि एक महिन्याच्या आत ते काम संपेल. त्यांना ज्या ठिकाणचे काम दिले आहे ते होईल.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आमच्या भागातील कचरा प्रकल्पाचे काम सुरू झालेले नाही
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–त्या संदर्भात पुन्हा इन्स्पेक्शन करून घेऊ.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–सर्व्हे केलेला आहे आणि हा सर्व्हे जबाबदार लोकांनी केला आहे.
मा.महा.आयुक्त–आपण आता आय.आय.टी.मधील दोन तीन लोकांची ॲडव्हॉयजरी कमिटी करीत आहोत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–लवकर स्थापन करा.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यामध्ये लोकप्रतिनिधीचा समावेश करावा.
मा.महा.आयुक्त–ती टेक्नीकल कमिटी आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यामध्ये नगरसेवक प्रश्न विचारतील.
मा.महा.आयुक्त–ती फक्त टेक्नीकल कमिटी आहे त्यामध्ये तुम्ही नसणार.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–आता पूर्वीपेक्षा चांगली स्थिती आहे. सॅग्रीगेशन स्टोअरेज झिरो आहे.
मा.सौ.आरती बाबर–मा.आयुक्त साहेबांनी आमचा विषय मार्गी लावावा. मा.जगताप साहेबांनी आश्वासने दिली परंतु आता आमची टर्म संपत आली आहे.
मा.सौ.नंदा लोणकर–माझ्या प्रभागात सुध्दा नियमितपणे कचरा उचलला जात नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–आता सध्या प्रक्रिया केलेला कचरा शेतकऱ्यांसाठी पाठविला जातो का?
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–होय, आता नोबेल प्लॅन्ट चालू झाला आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–कचरा उचलला जात नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–रोकेमच्या बाबतीमध्ये आपले काम ज्या पध्दतीने झाले पाहिजे तसे झालेले दिसत नाही आता रोकेम प्लॅन्ट बंद आहे का?
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–२२ तारखेपासून बंद आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–मग रोकेम मध्ये जाणारा कचरा जातो? म्हणजे हाच कचरा शहरात साठून रहात आहे.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–हा प्रकल्प ८ दिवसांपासून बंद आहे त्याची कॅपेसिटी वाढवायची आहे. पुढील १० ते १५ दिवसांच्या आता सुरू करण्याचे नियोजन आहे.३५० टन पूर्ण क्षमतेने सुरू होईल.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–पुढील १५ दिवसाचा रोकेमचा एक पार्ट सुरू होईल.
मा.सौ.आरती बाबर– आमच्या प्रभागातील कामासाठी एक मिटींग आयोजित करावी. मा.आयुक्त साहेबांनी सुध्दा तिथे दोनदा व्हिजीट केली आहे.
मा.महा.आयुक्त–पुढील १५ दिवसात प्लॅन करून ते काम करू.
मा.अनिल राणे–आमच्या प्रभागात श्रेंडीग मशीन बसवायचे आहे.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–आपल्या भागामध्ये श्रेडींग मशीन बसविण्याची व्यवस्था केलेली आहे.
मा.अनिल राणे–ॲग्रीमेंटला उशीर झाला तर काही तांत्रिक अडचण होऊ शकते का?
मा.महा.आयुक्त–रजिस्ट्रेशन फी..
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय–मा.सह.महा.आयुक्त, घ.क.व्यवस्थापन यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

विषय क्र.१९५७/ठराव क्र.१९५७

दि.३०/११/२०१५ ते दि.६/१२/२०१५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/८२९ दि. २८/१२/२०१५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय–मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**
विषय क्र.१९५८/ठराव क्र.१९५८

दि. ७/१२/२०१५ ते दि. १३/१२/२०१५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/८३० दि. २८/१२/२०१५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय–मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

## सर्वात कमी रकमेची टेंडर्स

विषय क्र.१९५९/ठराव क्र.१९५९

महर्षीनगर येथील कै. लहाने पथ रस्ता डांबरीकरण करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,३८,९२३/– पेक्षा १४.४१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५८,५३,४३४=१९ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८२३ दि. २८/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६०/ठराव क्र.१९६०

प्रभाग क्र.४१ ब डोबवाडी ते कवडे मळा रस्ता यु.टी.डब्ल्यु. टी. पध्दतीने कॉंक्रिटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जे. पी. एन्टरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,४८३/– पेक्षा २०.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७९,२९,५९०=०१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार वाढ अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८२४दि. २८/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६१/ठराव क्र.१९६१

बंडगार्डन रस्ता वाडिया कॉलेज ते बंडगार्डन पुल पर्यंत ऑग्रेड, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व वाहतूक विषयक कामे करणे व सौरभ हॉल ते मोबेज फुटपाथ दुरूस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अभिजीत एन्टरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८२,७७,९६८/– पेक्षा २२.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६४,४८,५३७=०७ पर्यंत काम करून घेणेस टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८२५ दि. २८/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६२/ठराव क्र.१९६२

प्रयेजा सिटी येथील नाल्यावर संरक्षक भिंत बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमूर्ती स्टोन मेटल कंपनी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,८७,९४६/– पेक्षा ८.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४३,९६,२९२=०२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८२६दि. २८/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६३/ठराव क्र.१९६३

पथ विभागाकडील कार्यकारी अभियंता क्र. ४ कार्यक्षेत्रातील विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयामधील विविध रस्त्यांवर पुर्नडांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. टी. जी. धमाणी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९८,४८०/– पेक्षा ३.२३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९६,७५,५२९=०९ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८३१ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६४/ठराव क्र.१९६४

प्रभाग क्र. १७ ब मध्ये विविध वाहतूक विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. राजेश एंटरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,७८,०८०/– पेक्षा २३.५% कमी) असल्याने त्यांचेकडून

र.रु. ३८,०८,२३१=२० रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक बाजारभाववाढ सुत्रानुसार तसेच सिमेंट, लोखंड, डांबर या मटेरिअलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरातील प्रत्यक्ष फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मु.अ.(प्र)/८३२, दि. २९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६५/ठराव क्र.१९६५

पुणे मनपाचे फुटओव्हर ब्रीज, भूयारी मार्ग येथे देखभाल दुरूस्तीची कामे तसेच विविध प्रकारची कामे करणेकामी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अभिजीत एन्टरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८६,४७,८७७/– पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७०,९१,२५९=१४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीवरील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/मु.अ.(प्र)/८३३ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६६/ठराव क्र.१९६६

वडगाव गावठाण ते पाउंजाई मंदिर ते बिल्डिंग ते सव्हिस रोड(हाइवे) रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. टी. जी. धमाणी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ४१,०३,९९९/– पेक्षा ३.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,७१,८५०=२३ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८३४ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६७/ठराव क्र.१९६७

कोथरूड क्षेत्रिय कार्यलयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिकस्वच्छता व झाडण काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. हेमंत वी. शाह यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९९,५७१=८४ पेक्षा ९.५३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९०,४६,६१२=६४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/उआ(परिमंडळ–१) /८३६ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९६८/ठराव क्र.१९६८

सन २०१५–२०१६ साठी पुणे मनपाच्या विविध निधीमधुन ८० लिटर व ७.५ लिटर क्षमतेच्या प्लॉस्टिक बकेट वार्षिक दर करार पध्दतीने पुरविणे कामी निविदा मागविली असता आलेल्या ६ निविदाधारकांपैकी मे. पायल इंडस्ट्रीज, पुणे यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून सन २०१५–२०१६ मध्ये वार्षिक दर करार पध्दतीने ८० लिटर क्षमतेच्या हिरव्या व पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिक बकेट व ७.५ लिटर क्षमतेच्या हिरव्या व पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिक बकेट मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या स्पेसिफिकेशन नुसार वार्षिक दर करार पध्दतीने र.रू.५,००,००,०००/– पर्यंत खरेदी करण्यास व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस तसेच त्याप्रमाणे त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/भांडार/८३७ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–या विषयाची माहिती द्यावी.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–या बकेटस खूप लहान आहेत त्या मोठ्या हव्यात.

मा.अविनाश बागवे–आपण हे महापालिकेच्यावतीने करीत आहोत की, वॉर्डस्तरीय मधून करीत आहोत?

मा.सुरेश जगताप–यामध्ये डी.पी.डी.सी.,वॉर्डस्तरीय, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील तरतूद अशा तीन वेगवेगळया तरतुदी आहेत.

मा.महा.आयुक्त–यामध्ये प्रत्येकवेळी वेगवेगळा दर नसतो तर एकच दर असतो. हे महापालिकेने टेंडर मागवून केले आहे.

मा.अनिल राणे–खात्याला ३ कोटी ४२ लाख रू.दिलेले आहेत ती रक्कम कोठे देणार आहात? कोणी मागणी केली आहे का?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.आयुक्त(वि)–घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे बकेटसाठी ८० लाख रू.ची तरतूद आहे.

मा.अनिल राणे–आपण ते स्वच्छला दिले आहेत का?

मा.अविनाश बागवे–त्यांनी मागणी केली होती का?

मा.महा.आयुक्त–आपल्याला हे दरवर्षी करावे लागणार.
मा.अनिल राणे–मा.आयुक्त साहेबांनी सर्क्युलर काढले आहे.
मा.महा.आयुक्त–त्यामुळे रिकव्हर करता येईल.
मा.सौ.मुक्ता टिळक–आपण सगळया बाबतीत अशीच अडवणूक करता.
मा.अनिल राणे–चित्र पाहिले तर, सभासदावर आरोप होतात.
मा.अविनाश बागवे–हा विषय आठवडा पुढे घ्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.अनिल राणे–बकेटस घेतल्या तरी सुध्दा त्या मिळत नाहीत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही माहिती घ्या, दरवर्षी बकेटस दिल्या जातात.
मा.अनिल राणे–घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील ३ कोटी ४२ लाख रू. या तरतुदीबाबतची माहिती द्यावी.
मा.अध्यक्षा–मा.सभासदानी मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करून द्यावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–ही मान्यता देत असताना यामध्ये एकूण किती बकेटस येणार आहेत? तसेच चालू अंदाजपत्रकामध्ये सर्व प्रभागाना किती बकेटस देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी.
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

विषय क्र.१९६९/ठराव क्र.१९६९

प्रभाग क्र.३७ अ रमणबाग चौक ते शिंदेपार दरम्यानचा रस्ता यु.टी.डब्ल्यु. टी. पध्दतीने काँक्रिटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वामीराज एंटरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,९९,८७२/– पेक्षा १४.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५१,०५,८९१=०७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८३८ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७०/ठराव क्र.१९७०

प्रभाग क्र.३७ अ पत्र्या मारूती ते लोखंडे तालीम दरम्यानचा रस्ता काँक्रिट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वामीराज एंटरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,७७८/– पेक्षा १४.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,०३,८११=०८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/८३९ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७१/ठराव क्र.१९७१

टिळक रोड क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीचे झाडण काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री एंटरप्रायझेस् यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,९९७=५५ पेक्षा ८.०५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९१,९४,९९७=७५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र.मआ/उआ(परिमंडळ–३)/८४२ दि. २९/१२/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

## एकच टेंडर प्रकरणे

विषय क्र.१९७२/ठराव क्र.१९७२

सॅनिटरी नॅपकिन्सची इन्सिनरेशन पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी जनजागृती, प्रभागातून गोळा करणे, विल्हेवाट लावणे, मशीन्सची देखभाल दुरूस्ती करणे (३ वर्षासाठी) (बी–२ पध्दतीने) कामी निविदा मागविली असता ठेकेदार मे. जनआधार सेवाभावी संस्था यांची एकच निविदा आली असल्याने त्यांचेकडून अ) जनजागृती कार्यक्रम ब) प्रभागातून गोळा करणे, विल्हेवाट लावणे क) मशीनचे देखभाल दुरूस्ती करणे असे एकूण र.रू.९५,७३,६००/–रकमेपर्यंत (सर्वकरांसहित) ३ वर्षासाठी काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/८३५ दि.२९/१२/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्षा–या विषयाची माहिती द्यावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.

मा.अनिल राणे–या विषयाची माहिती द्यावी.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–मा.अध्यक्षा, महोदया, मा.सौ.मुक्ता टिळक यांच्या प्रभागामध्ये, सॅनिटरी नॅपकिन्सची ईन्सीरेशन पध्दतीने विल्हेवाट लावणे, जनजागृती, प्रभागातून गोळा करणे, मशीन्सची दुरूस्ती करणे इ.साठी हा विषय आहे.
मा.अध्यक्षा–या प्रकल्पासाठी एकूण किती जागा आवश्यक असते?
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–१५ बाय १२ जागा आवश्यक असते आणि या मशीन्समध्ये दररोज ६५० ते ७०० नॅपकीन्स डिस्कार्ड केले जातात.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–संपूर्ण पुणे शहरातील सर्व प्रभागात अशा प्रकारचे प्रकल्प करायचे असतील तर किती तरतूद करावी लागेल? याबाबतची माहिती द्यावी.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–पॉलिसी निर्णय घ्यावा लागेल. प्रत्येक प्रभागातील कलेक्शन, सॅनिटरी नॅपकिन्स डिस्पोजल मशीन बसविणे, याकरिता ४.५०.लाख रू.खर्च येतो आणि प्रत्येक ठिकाणी हे मशीन बसावायचे झाल्यास साधारणत: महिन्याला १ ते सव्वा कोटी रू.इतके गणित आहे, तेवढी यंत्रणा उभारावी लागेल.
मा.सौ.मुक्ता टिळक–दोन प्रभागात मिळून एक मशीन बसवावे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–संपूर्ण पुणे शहर कव्हर होईल, असे करा.
मा.अध्यक्षा–आपण ही मशीन्स कोठे कोठे बसविली आहेत? याबद्दल माहिती द्यावी.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–कसबा पेठ क्षेत्रिय कार्यालय, २ मशीन्स, ढोले पाटील क्षे.कार्यालय,१ मशीन...
मा.अध्यक्षा–आमच्या सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाकडे मशीन्स बसविण्याबाबत मागणी केली होती का?
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–मा.अध्यक्षा, ही आपली मागणी होती.
मा.अध्यक्षा–आपण त्यावेळी काय उत्तर दिले होते? ते सांगा.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल, असे सांगितले होते.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–या विषयाला कोणाचा विरोध आहे का? आमचे होईल म्हणून आपण मध्येच सगळयांनी विरोध करायचा का? आमचे म्हणणे असे आहे की, ही सर्व्हिस सर्व ठिकाणी देण्यासाठी किती पैसे लागणार आहेत ते पहा. महापालिकेत असे विषय होणार आहेत.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–मा.चेअरमन मॅडम यांच्या प्रभागामध्ये जागेचा प्रश्न होता.
मा.अध्यक्षा–तुम्हाला सहकारनगर मध्ये जागा मिळाली असती.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–मा.अध्यक्षा, जागेमुळे तो प्रस्ताव राहून गेला आहे.
मा.अध्यक्षा–मी जागा सुचविली होती. सहकार नगर क्षेत्रिय कार्यालयाचा विषय घेतला असता तर हा प्रश्न सुटणार होता. परंतु तुमची नकारात्मक भूमिका होती. मधल्या काळामध्ये दोन ठिकाणांसाठी मिळून एक मशीन बसवायला कोणी विरोध केला होता? याबद्दल माहिती द्या.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–हा विषय संपूर्ण पुणे शहरामध्ये करण्यासाठी किती तरतूद आवश्यक आहे? याबाबत माहिती द्यावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–दोन ते तीन कोटी रूपयामध्ये होईल.
मा.अध्यक्षा–मी सगळया गोष्टी केल्या होत्या. मला मिनिटसवर माहिती हवी आहे.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–याबाबत मॅडम आपण एक दीड वर्षापासून माहिती घेत आहात.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करा परंतु मला माहिती हवी आहे.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–पुढील आठवड्यामध्ये संपूर्ण पुणे शहरासाठी करणार आहोत त्याचा प्रस्ताव आणणार आहात का?
मा.महा.आयुक्त–त्यासाठी तरतूद लागणार आहे.
मा.अध्यक्षा–कचरा व्यवस्थापनासाठी भरपूर पैसे दिलेले आहेत.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–प्रशासनाने मनावर घेतले तर होईल.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–संपूर्ण पुणे शहरासाठी हे युध्द पातळीवर सुरू करावे.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–आणखी दोन तरी करा.
मा.श्रीकांत जगताप–प्रत्येक वॉर्ड ऑफिस एक करा.
मा.अध्यक्षा–त्यावेळी मी हेच सुचवित होते.
मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्यव)–कलेक्शन कॉस्ट वाढेल
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये हाऊस टू हाऊस कलेक्शन करावयाचे आहे आणि ते स्वच्छ संस्थेचे लोक आणून करतात.

## सर्वात जास्त रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र.१९७३/ठराव क्र.१९७३

पुणे स्टेशन समोरील कै.तुकाराम शेठ शिंदे वाहनतळ बेसमेंट,तळमजला, पहिला, दुसरा, तिसरा मजला दुचाकी वाहनांसाठी ५ वर्षे कालावधीसाठी मक्ता पध्दतीने देणेकामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या

असून सर्वात जास्त दर देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक मे.शुभांगी एंटरप्रायजेस, १८५,महात्मा गांधी मार्ग, कॅम्प, पुणे.१ यांनी देवू केलेली वार्षिक मक्ता र.रुपये ७७,७७,७७७/- ही मनपा निर्धारीत वार्षिक र. रू. ३७,५९,९४८/- या रकमेपेक्षा र.रू. ४०,१८,७२९/- ने जास्त असल्याने सदरचे वाहनतळ त्यांना त्यांनी देऊ केलेली वार्षिक मक्ता र.रुपये ७७,७७,७७७/- प्रमाणे मक्ता पध्दतीने ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी निविदेतील अटी व शर्तीनुसार कराराने देणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/८४४ दि.२९/१२/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.

मा.सौ.मुक्ता टिळक-विषय क्र.१९७३ ला आमचा विरोध आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-आता हा विषय मान्य झाला आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक-आम्हाला या विषयाची माहिती द्यावी. आम्हाला या विषयाबद्दल बोलायचे आहे. आता आपण हा वाहनतळ देत आहोत तो कोणाला मंजूर झाला आहे? त्यांचा निविदा दर काय होता? त्यांनी अजून किती ठिकाणी टेंडर भरले होते? याबद्दल माहिती द्या. यामध्ये आणखी दुसरे कोणाला ब्लॅक लिस्ट केले आहे का? किंवा करणार आहात का?

मा.कुलकर्णी, उपायुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-यामध्ये शुभांगी इंटरप्रायझेस हे होते दुसऱ्या कोणीही भाग घेतला नाही. त्यांना आणखी इतर ३ ठिकाणचे वाहनतळ मंजूर झाले आहेत. ते १ वर्षाची अनामत रक्कम भरून घेऊन करारनामा करण्याची मागणी करीत आहेत. नारायण पेठ, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्योग भवन या दोन ठिकाणचे सुध्दा मंजूर झाले आहेत परंतु अद्याप रक्कम भरून करारनामा केलेला नाही. ५ वाहनतळ दिले आहेत तीन मंजूर झाले आहेत परंतु रक्कम भरायची आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक-आता कोणता वाहनतळ दिला आहे?

मा.कुलकर्णी, उपायुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-पुणे स्टेशन समोरील कै.तुकाराम शेठ शिंदे हा वाहनतळ ठेकेदारीवर दिला आहे. लक्ष्मीरोड वरील वाहनतळ अजून सुरू झालेले नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक-अनधिकृत पार्किंग होते याबाबत अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे का? आपण ५ मजल्यांवर पार्किंग दिले आहे आणि आर-सेव्हन खाली वेगळे दिले आहे. आपण अनधिकृरित्या दुसऱ्या कोणाला वाहनतळ दिला आहे का?

मा.कुलकर्णी, उपायुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-ही वस्तुस्थिती आहे की, ते ताब्यात आलेले नाही आणि यंत्रणा नसल्यामुळे असे होत आहे. यासाठी तेथे एजन्सी नेमून वाहनतळ सुरू करायचा आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-तेथे सुरक्षारक्षक नेमावा. लोक बाहेर पार्किंग करतात.

मा.सौ.मुक्ता टिळक-तेथे महानगरपालिकेच्या मालकीचा वाहनतळ आहे.

मा.कुलकर्णी, उपायुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-अनधिकृतपणे पैसे वसूल करीत असल्याची तक्रार नाही. तेथे पार्किंग व्यवस्थेची कार्यवाही करू.

मा.सौ.मुक्ता टिळक-जो माणूस पैसे भरत नाही आणि त्याला ५,५ ठिकाणचे वाहनतळ दिले आहेत. तुम्ही संबंधीतांना ब्लॅक लिस्ट करा.

मा.कुलकर्णी,उप आयुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-मुदतीमध्ये करार केला नाही तर ई.एम.डी.जप्त करू आणि वेळेमध्ये भाडे भरले नाहीतर त्यांना ब्लॅक लिस्ट करून नवीन फेरटेंडर करू.

मा.सौ.मुक्ता टिळक-मा.अध्यक्षा, याठिकाणी ठेकेदार अतिशय चुकीच्या पध्दतीने काम करीत आहे आणि महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे. महापालिकेचा महसूल वाया जात आहे. अनामत रक्कम भरली जात नाही, अशा ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट केले पाहिजे.

मा.अविनाश बागवे-मा.अध्यक्षा, प्रशासनाने याबाबत चौकशी करावी आणि संबंधितांवर कारवाई करावी परंतु हा विषय मान्य करावा.

मा.कुलकर्णी,उप आयुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-मुदतीमध्ये भरले नाहीत तर करू.

मा.सौ.मुक्ता टिळक-मा.अध्यक्षा, महापालिकेचे नुकसान होत असेल तर मंजूर करण्यात येऊ नये. त्यांना मुदत द्यावी त्यांनी पुढील दोन महिन्यात किंवा दि.१५ मार्च पर्यंत पैसे भरले नाहीत तर? त्यामुळे हा विषय मान्य करू नये.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-आपण विरोध करू नका.

मा.अध्यक्षा-प्रशासन त्यांच्याबाबतीत चौकशीचे आदेश देऊ शकते का? नियमाप्रमाणे झाले नाहीतर त्यांच्यावर कारवाई करून कंट्रोल ठेवता येईल का? याबाबत माहिती द्यावी.

मा.कुलकर्णी, उप आयुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)-करारनामा झाला नाही किंवा अनामत रक्कम भरली नाही तर दुसऱ्याला देता येईल.

मा.अध्यक्षा-वर्क ऑर्डर देताना संबंधितांना सूचना द्यावी की, आपल्याला ब्लॅक लिस्ट केले जाईल.

मा.सौ.मुक्ता टिळक-या विषयाला आमचा विरोध आहे. यामध्ये महापालिकेचे नुकसान होत आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-आम्हाला विरोधी पक्षनेत्यांच्या बरोबर राहिले पाहिजे.

मा.श्रीकांत जगताप-या विषयाला आमचा विरोध आहे. या विषयावर मतदान घ्यावे.

नगरसचिव-विषय क्र.१९७३ मान्य करण्यास विरोध झाल्यामुळे मी या विषयावर मतदान घेतो.

अनुकूल -१३

प्रतिकूल-३

**निर्णय-सदरचा विषय बहुमताने मान्य करण्यात आला.**

## मागील सभेचे विषय

विषय क्र.१९७४/ठराव क्र.१९७४

शिवाजी रोड ( फडगेट पोलिस चौकी ते स्वारगेट, लाल महल ते बुधवार चौक)डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,३९,७८२/- पेक्षा ५.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६४,३०,०७९=०५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७७९ दि.२१/१२/२०१५ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७५/ठराव क्र.१९७५

म्हाळगी पथ रस्ता पुर्नडांबरीकरण करणे ( मित्र मंडळ चौक ते ई लर्निंग स्कुल) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६९,९९,९४८/- पेक्षा ५.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६६,१४,९५०=८६ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७८१ दि.२१/१२/२०१५ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७६/ठराव क्र.१९७६

म्हाळगी पथ रस्ता पुर्नडांबरीकरण करणे ( ट्रेझर पार्क ते ई लर्निंग स्कुल) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,९७९/- पेक्षा ५.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९४,४९,९८०=१५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७८५ दि.२१/१२/२०१५ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७७/ठराव क्र.१९७७

रामेश्वर चौक ते शनिपार व परिसरातील रस्ते मिलिंग करून डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,९८६/- पेक्षा १०.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३०,७४,५६७=४१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७८७ दि.२१/१२/२०१५ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७८/ठराव क्र.१९७८

सहकारनगर नं. १ पुरग्रस्त वसाहती मधील रस्ते पुर्नडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६९,९९,९२३/- पेक्षा २.२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६८,४५,९२४=६९ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७९२ दि.२१/१२/२०१५ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९७९/ठराव क्र.१९७९

प्रभाग क्र. २३ मधील स.नं. १४९५ मधील नियोजित उद्यानाची सिमाभिंत व पेव्हींग वॉल बांधणे, झाडाला पार करणे व इतर विकसनाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सागर एस.यादव यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३३,२४,९४६=७४ पेक्षा २.३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,४८,४७२=९६ पर्यंत काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/७३५ दि. ११/१२/२०१५ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय क्र.१९८०/ठराव क्र.१९८०

पुणे शहरातील स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (डिपीआर) तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांची नेमणूक करणेसाठी अंदाजपत्रकातील तरतुदींतील रक्कम रूपये २२८ लक्षाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/मलनि/७६५ दि.१६/१२/२०१५ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५–२०१६ चे अंदाजपत्रक, मलनि:सारण देखभाल दुरुस्ती विभाग, १)XE23A109, हायकॉपेसिटी सक्शन कम जेटिंग विथ वॉटर रिसायकलींग यंत्रणेद्वारे सिव्हर लाईन्स व मॅनहोलची साफसफाई करणे. | १२८ लक्ष | --- |
| २) ZE16D101/MP2-503, पुणे मनपा हद्दीत मैलापाणी वहन व्यवस्थेबाबत मास्टर प्लॉन तयार करणे व तद्.कामे करणे | १०० लक्ष | --- |
| नविन सुचविलेले काम<br>पुणे शहरातील स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (डिपीआर) तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ( पी.एम.सी.) यांची नेमणूक करणेबाबत | --- | २२८ लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा या विषयाबाबत प्रेझेंटेशन घ्यायचे आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–या विषयावरील प्रेझेंटेशन सुरू करावे.

मा.अविनाश बागवे–या प्रेझेंटेशनची सी.डी. आम्हाला देण्यात यावी.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–याबाबतची सर्व माहिती द्यावी.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपण या कामांवर व्हिजीटस करू, अजून त्यांचे पैसे देणे बाकी शिल्लक आहेत. याबाबतचे नियोजन पुढील आठवड्यात करावे.हा विषय मान्य करावा.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा.अनिल राणे–रजपूत झोपडपट्टी येथील नदीकाठचा रस्ता करणे या कार्यवाहीची माहिती द्यावी.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–येथील जागेच्या फेरमूल्यांकनाबाबत आपण नगररचना विभागाला पत्र पाठविले होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.सभासदाची मागणी रास्त आहे. तेथील लोकांना रस्त्याची गरज आहे. यामध्ये कागदोपत्री कामकाज न करता हा रस्ता होऊ शकतो की नाही?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–यामध्ये फक्त एन.जी.टी.ची अडचण आहे आणि त्यांच्या मान्यतेनंतर होऊ शकतो.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण एन.जी.टी.कडून मान्यता घेऊ शकतो, याची आपल्याला खात्री आहे का?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–या संदर्भात आपण आपल्या वकिलाशी कॉन्टक्ट केलेले आहे. यामध्ये जो रोड खात्याचा प्रस्ताव सुध्दा तयार करून घेतला आहे. हे सगळे सादर केल्यानंतर आपल्याला एन.जी.टी.ची मान्यता मिळेल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण तिथे एन.जी.टी.ची मान्यता घेतल्याशिवाय तिथे काम करू शकत नाही.

मा.अनिल राणे–हे प्रशासनाला कधी कळाले?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–मा.अध्यक्षा, यामध्ये जेव्हा विठ्ठलवाड्डी ब्रीजच्या बाबतीत एन.जी.टी.चा निकाल लागला आणि आपण सुप्रीम कोर्टात सुध्दा गेलो आणि त्यानंतर हे कायम झाले की, ब्ल्यु लाईन मध्ये कोणतेही बांधकाम करता येणार नाही. याबद्दल अनेकवेळा चर्चा झालेली आहे. फक्त १०० मीटरचा पोर्शन आहे की जो ब्ल्यू लाईन मध्ये कन्स्ट्रक्ट करावा लागणार आहे आणि अलका टॉकीज पासून किंवा..

मा.अनिल राणे–महानगरपालिकेपासून

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–महानगरपालिकेपासूनचा संपूर्ण रस्ता ब्ल्यू लाईन मध्येच आहे. तो पूर्वीच कन्स्ट्रक्ट केलेला आहे. पण आता ह्या नवीन निकालामुळे आपल्याला अडचण निर्माण झालेली आहे की, आपल्याला ब्लू लाईन मध्ये कन्स्ट्रक्शन करता येत नाही. त्यामुळे आपल्याला त्यांची (एन.जी.टी.ची) संमती घ्यावी लागेल.

अविनाश बागवे–सर, आपण कच्चा रस्ता करून वापरू शकतो का?

मा.अनिल राणे–याठिकाणी रस्ता करतो येतो का? एवढेच सांगा.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–एन.जी.टी.ची परवानगी घ्यावी लागेल.

मा.अनिल राणे–तसे निकालामध्ये म्हंटले आहे का?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–ब्लू लाईन मध्ये कुठलेही कन्स्ट्रक्शन करू नका, असे म्हंटले आहे.

मा.अनिल राणे–म्हणजेच उड्डाणपूल करून सुध्दा करता येणार नाही.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–त्यासाठी मान्यता घेऊन करावे लागेल.

मा.अनिल राणे–पुणे शहरात तुमचे सध्याचे जे उड्डाणपुलाची कामे असतील ती बंद आहेत का?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–त्याबाबत फक्त एक किंवा दोन पिलर्स, खांब येतात.

मा.अनिल राणे–आम्ही उड्डाणपूल असेच म्हणत आहोत.

मा.अविनाश बागवे–त्यांचा ऑप्शन असा आहे की, तिथे उड्डाणपूल सुध्दा होऊ शकतो.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–त्यांचा ऑप्शन असा आहे की, जो वरचा रस्ता आहे तो ॲप्रोच रस्ता ब्रीजपासून करावा परंतु तो क्रॉस सेक्शन एरिया कमी जास्त म्हणजे मोठ्या प्रमाणावर होतो. इतर कॉलम असतील तर छोटे कॉलम..

(सभागृहात गोंधळ सुरू होता.)

मा.सौ.मुक्ता टिळक–हाईट वाढविता येत नाही का?

मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते दुसरा पर्याय, आपण कच्चा रस्ता केला तर वापरण्यास सुरूवात होईल.

मा.अनिल राणे–यांना रस्ता करण्यास अडचण आहे तर यांनी भूसंपादन करावे आणि तेथून गाड्या कशा न्याव्यात ते आम्ही पाहतो.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–समजा, आपण तिथे आता कच्चा रोड चालू केला तर आपल्याला काही प्रॉब्लेम होईल का?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आधी भूसंपादन करून घ्या.

मा.अविनाश बागवे–आपण भूसंपादन करून ठेवले आणि यामध्ये एन.जी.टी.चे नियम बदलले किंवा काही निर्णय लागेपर्यंत आपण तिथे कच्चा रस्ता सुरू करू शकत नाही का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तेथील किंमत जास्त होईल, असा तो एरिया नाही.

मा.अविनाश बागवे–आपण कच्चा रस्ता वापरला तरी तेथील ट्राफीक कमी होईल.

मा.अनिल राणे–मा.आयुक्त साहेब, तुम्ही १० कोटी रू.आणि २० कोटी रू.चा विषय काढून, तुम्ही पुणेकरांसाठी खर्च करण्यास मागे पुढे पहात आहात का?

मा.अविनाश बागवे–तिथे कच्चा रस्ता होऊ शकतो का?

मा.अनिल राणे–त्यासाठी मालक जागा देणार नाही. मग दीड वर्षापूर्वी हे कधी ब्ल्यू लाईन कुठे आहे? हे माहिती नव्हते का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या ठिकाणची जागा भूसंपादन करून घ्यावी, असा आम्ही सर्वानुमते ठराव करून देतो त्यानुसार कार्यवाही करून जागा ताब्यात घ्यावी नंतर एन.जी.टी.मध्ये जो काही निर्णय होईल तो होईल. यामध्ये जर समजा उद्या एन.जी.टी.मध्ये गेल्यानंतर तुम्हाला कोणी दोष देणार असतील तर त्याला देखील आम्ही १६ सभासद जबाबदार राहू. ही जबाबदारी आपण घेऊ

मा.अविनाश बागवे–पैसे वाया जाणार नाहीत आपण त्या जागेचा वापर इतर कारणांसाठी सुध्दा करू शकतो परंतु वाहतूकीसाठी तर जास्त सोयीस्कर आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण जागा पण घेऊ शकत नाही का?

मा.अनिल राणे–साहेब, आपण फक्त ह्या रस्त्यासाठी एन.जी.टी.चा नियम लावत आहात. तुम्ही आमच्याकडून साबरमती सारख्या प्रोजेक्टसाठी, तेथील विकास कामांसाठी मान्यता घेतली तेव्हा एन.जी.टी.च्या परवानगी घेतली का? मग अशा पध्दतीने पुणेकरांचे पैसे फुकट का घालवित आहात? तिथे पुणेकरांचे पैसे खर्च होणार आहेत की नाही? तुम्ही आता प्लॅन करायला पैसे खर्च करीत आहात. समजा उद्या एन.जी.टी.ने परवानगी दिली नाही तर, ते पैसे वाया जाणार आहेत की नाही? मग याला जबाबदार कोण? तुम्हाला जे वाटते ते तुम्ही करून घेता आणि साहेब, आम्ही जे सांगतो ते अडचणीचे वाटते. तुम्ही आज आम्हाला ब्ल्यू लाईन बद्दल सांगत आहात. आम्ही दीड वर्षापासून भांडत आहोत. ही ब्ल्यू लाईन कोणी केली? ती तेवढीच केली का? पुढच्या लाईन मध्ये दोन बांधकामे झाली आहेत. त्यांना ब्ल्यू लाईन नाही का? आपण तिथे जाऊ शकत नाही का? तिथे कोर्ट येत नाही का? साहेब, तुम्ही फक्त इतके दिवस पुणेकरांची फसवणूक करीत आहात. साहेब, तुम्हाला तिथे काम करायचे नाही.

मा.महा.आयुक्त–ते काम होणे शक्यच नाही आणि त्या कामासाठी १० कोटी रू.खर्च करणे योग्य आहे का? हा विचार सभागृहाने करावा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही १६ सभासद त्यासाठी तुम्हाला विनंती करीत आहोत.

मा.महा.आयुक्त–एन.जी.टी.च्या कारणास्तव जर ते काम करणे शक्य झाले नाही तर त्या भूसंपादनासाठी १० कोटी रू.चा खर्च करून कोणता उपयोग होणार? याबाबत सभागृहाने निर्णय घेणे आवश्यक आहे. आम्हाला रस्ता करायला काही अडचण नाही.

आम्ही रस्ता करणेसाठी एन.जी.टी.कडे प्रस्ताव देत आहोत. एन.जी.टी.ने मान्यता दिली तर आपण रस्ता करण्यासाठी तरतूद करू आणि आपण भूसंपादनकडे जाऊ.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुम्ही म्हणता त्याप्रमाणे समजा भूसंपादन केले आणि एन.जी.टी.ने मान्यता दिली नाही तरी तेथील कच्च्या रस्त्यावरून वाहने जाऊ शकतील.

मा.अनिल राणे–तिथून १०० टक्के वाहने जाणार.

मा.महा.आयुक्त–एन.जी.टी.ने आपल्याला आपण केलेला रस्ता उखडायला लावला होता.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–रस्ता करायचा नाही. भूसंपादन केल्यानंतर तिथे जे बॅरिकेडस लावले आहेत ते काढले जातील.

मा.महा.आयुक्त–हा विषय सुध्दा यापूर्वी झाला आहे. आपले एस.एल.अे., लिगल अॅडव्हॉयजर इथे बसले आहेत. आपण त्यांना विचारू.

मा.अनिल राणे–तुम्ही रस्ता करू नका परंतु तुम्ही भूसंपादन केल्यानंतर तुमच्यावर ऑब्जेक्शन येणार आहे का? आमचे म्हणणे असे आहे की, भूसंपादन करा परंतु रस्ता करू नका. साहेब, त्यामुळे लोक तो रस्ता वापरतील.

मा.महा.आयुक्त–लोकांना वापरण्यासाठी भूसंपादनाची आवश्यकता काय आहे?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आवश्यकता आहे.

मा.अविनाश बागवे–जमीन मालक परवानगी देत नाही.

मा.महा.आयुक्त–एन.जी.टी.ने वापरावर बंधने आणली तर काय करणार?

मा.अनिल राणे–कसे काय?

मा.महा.आयुक्त–आपण लिगल अॅडव्हॉजरला विचारू.

मा.रविंद्र थोरात (विधी सल्लागार)–ग्रीन ट्रॉब्यूनलच्या डिसीजनचे व्हॉयलेशन झाले तर १० कोटी रू आणि प्रत्येक दिवशी २५ हजार रू.इतका दंड आहे.  यामध्ये आणि सुप्रीम कोर्टाचे दृष्टीकोन फार गंभीर आहेत.  त्यामुळे आपल्याला रस्त्याला, त्यांनी संभाजी बागेतील टाकी सुध्दा उखडवून टाकायला लावली. आपण पाणी स्टोअरेजसाठी अंडरग्राउंड टाकी परंतु ते सुध्दा त्यांनी खूप सिरीअस घेतले होते.

मा.अनिल राणे–आपण तिथे काहीच काम करायचे नाही.

मा.रविंद्र थोरात (विधी सल्लागार)–शेवटी तिथे वाहतूक होणार त्यामुळे आम्ही असे म्हणत आहोत की, एन.जी.टी.पुढे जाउन मान्यता घ्यावी.

मा.अविनाश बागवे–समजा आपण भूसंपादन केले आणि त्यानंतर एन.जी.टी.ने वाहतूक बंद करण्यास सांगितले तर आपण वाहतूक बंद करू.

मा.श्रीकांत जगताप–सर नंतर वाहतूक कशी थांबविणार?

मा.अविनाश बागवे–सर, एन.जी.टी.बाबतची तुमच्या मनातील शंका रास्त आहे. आपण भूसंपादन केल्यानंतर परवानगी नाकारली गेली तर पैसे वाया जातील, अशी शंका आहे परंतु आमची विनंती आहे की, तसे काही होणार नाही. यामध्ये दोन कारणे आहेत की, भूसंपादन केल्यानंतर ती जागा मनपाच्या मालकीची होईल आणि त्यानंतर जागा मालक कोणतेही बंधन घालू शकणार नाही. आपण त्याठिकाणी कच्चा रस्ता न बनविता, न काही करता तसाच ठेवू शकतो.

मा.महा.आयुक्त–महानगरपालिकेला एन.जी.टी.च्या परवानगीशिवाय तिथे कच्चा रस्त्यासाठी सुध्दा परवानगी देता येत नाही.

मा.अविनाश बागवे–आता आपण ब्ल्यू लाईनमधील, नदीपात्रातील रस्ता कसा वापरत आहोत?

मा.अनिल राणे–तुम्हाला ब्ल्यू लाईन मध्ये रस्ता करता येणार नाही. तुम्हाला ब्ल्यू लाईन मध्ये भूसंपादन करता येणार नाही. त्याच वस्तीमधून जाणारा २०५ चा रस्ता आहे त्याचे सुध्दा आता तुम्ही भूसंपादन करावे आणि तो तिथे बंद करावा. आता त्या वस्तीमधून जो रस्ता जातो त्याचे भूसंपादन झालेले नाही आणि आता तो रस्ता पुणेकर नागरीक वापरत आहेत. आता, दररोज ४० ते ५० हजार वाहने तेथून जात आहेत. तो रस्ता आता तिथून बंद करावा, तुम्ही भूसंपादन करू शकत नाही, एन.जी.टी.परमिशन देणार नाही तर हा रस्ता पण बंद करावा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–महापालिकेने भूसंपादन केले आणि नागरीकांनी तो रस्ता वापरण्यास सुरूवात केली तर महापालिकेला दोषी कसे ठरविता येईल?

मा.अनिल राणे–प्रशासन काहीही कारणे सांगत आहे.

मा.अविनाश बागवे–आता डेंगळे पूलाच्या खाली लोक बसतात.

मा.महा.आयुक्त–या विषयामध्ये ठराव करताना मी प्रशासनाच्यावतीने सांगू इच्छितो की, जर एन.जी.टी.च्या निर्णयाचे उल्लघंन झाले तर स्टॅंडिंग कमिटीच्या विरूध्द कंटेम्पंट ऑफ कोर्ट सुध्दा होऊ शकते. त्यामुळे हे करताना आपल्याला लिगल बाजू बघून निर्णय घेणे आवश्यक राहिल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण तिथे बांधकामासाठी परवानगी मागत नाही.

मा.अनिल राणे–तिथे पलिकडे बांधकामे सुरू आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–कंटेम्पंट झाला तर पैसे भरा म्हणतील का?

मा.अविनाश बागवे–आपल्याला कोणतेही बेकायदेशीर कृत्य करायचे नाही. आपल्याला आता सुध्दा तसे करायचे नाही आणि भविष्यात सुध्दा करायचे नाही. परंतु भविष्यामध्ये एन.जी.टी.त्यांचे लॉ चेंज करतील हे आपल्याला आता माहिती आहे का?

मा.महा.आयुक्त–म्हणून माझे म्हणणे आहे की, आपण एन.जी.टी.ची परवानगी घेणे योग्य राहिल.

मा.अविनाश बागवे–सर, ते तुम्हाला परवानगी देणार नाहीत. आता सुध्दा आपण जो रस्ता वापरतो त्याला सुध्दा परवानगी आहे का?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये भूसंपादनामध्ये फक्त मालकाचा अडथळा दूर करायचा आहे, आपला एवढाच रोल राहणार आहे.

मा.अविनाश बागवे–भूसंपादनाची कार्यवाही केल्यानंतर एन.जी.टी.चे कोणते व्हॉयलेशन होते त्याबद्दल माहिती द्यावी.

मा.रविंद्र थोरात (विधी सल्लागार)–त्यांनी तुम्ही ब्ल्यू लाईन का मेंटेन केली पाहिजे? आणि आता एन.जी.टी.ने स्पष्ट गाईडलाईन्स दिल्या की, आता ब्ल्यू लाईन मध्ये जी काही बांधकामे आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–बांधकाम हा विषयच नाही. फक्त संपादन करायचे आहे.

मा.रविंद्र थोरात (विधी सल्लागार)– ब्ल्यू लाईन मेंटेन करण्याबाबत व्ह्यू, गाईड लाईन्स दिल्या आहे.

मा.अविनाश बागवे–ब्ल्यू लाईन मेंटेन केली पाहिजे या मताशी आम्ही सगळे सहमत आहोत. पर्यावरणाबद्दल कोणतीही तडजोड करायची नाही. परंतु तुम्हाला भूसंपादन करण्यासाठी एन.जी.टी.ची काही अडचण आहे का?

मा.रविंद्र थोरात (विधी सल्लागार)– भूसंपादनासाठी अडचण नाही. ते तुम्ही करू शकता.

मा.अविनाश बागवे–प्रशासनाने भूसंपादन करावे आणि भविष्यात जेव्हा एन.जी.टी.चे लॉ चेंज होतील तेव्हा हे काम करू.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–इथे प्रश्नचिन्ह उभे राहते की, तिथे रस्ता केला तर तो विषय आपल्या अंगावर येईल. आपल्याला तिथे रस्ता करायचा नाही.  आज तिथे जे बॅरीकेटस लावले आहेत, ते मोकळे होईल.

मा.अविनाश बागवे–सर,काही गोष्टी जिथे वाहतूकीचा प्रश्न, जिथे कचराकोंडीचा प्रश्न आहे. त्याबाबत आउट ऑफ द बॉक्स विचार करणे आवश्यक आहे.  तुम्ही सुध्दा त्याठिकाणी मोठमोठ्या योजना केल्या आहेत.  त्या भविष्यात होतील किंवा होणार नाहीत परंतु आपण त्या ॲंगलने विचार करून काम करतो.  यामुळे त्यांच्या भागात खूप मोठा फरक पडणार आहे, त्यामुळे आमची विनंती आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्या एका सभासदाच्या प्रभागामध्ये विधायक काम करण्यासाठी आपण १६ सभासद त्यांच्या पाठीशी उभे राहू.

मा.अविनाश बागवे–मा.सभासदाच्या भूमिकेला सुध्दा पार्श्वभूमी आहे की, पूर्वी सुध्दा सभागृहनेत्यांनी सांगितल्यानंतर रस्ते तयार केले आहेत. परंतु नंतर कायदेशीर उत्तरे प्रशासनाला द्यावी लागतात.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण भूसंपादनाचा प्रस्ताव दिल्यानंतर त्यामध्ये काही अडचणी आल्यास ती आपल्या १६ सभासदाची जबाबदारी असेल.

मा.अविनाश बागवे–भूसंपादनासाठी कोणतीही अडचण नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही विधायक कामासाठी जबाबदारी घेऊ

मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्षा, महोदया, भूसंपादन हे कारणास्तव केले जाते. भूसंपादन करताना ती जमीन कोणत्या कारणास्तव घेतली जात आहे? हे दाखविणे आवश्यक आहे.

मा.अविनाश बागवे–आपण तसे कारण दाखवा की, भविष्यात एन.जी.टी.चे नियम बदलले तर आम्ही रस्ता करू. मा.आयुक्त साहेब, आपण जर पाहिले तर यापूर्वी प्रशासनाने कित्येक एकर जागा संपादित केल्या आहेत आणि आपण त्याचा उपयोग केला नाही. त्याचा उलटा दुरूपयोग होतो, बेकायदेशीर गोष्टी होतात. आपल्याकडे अशी अनेक उदाहरणे आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.आयुक्त साहेब आपण हे करा कारण या विधायक कामामुळे खूप मोठा फरक पडणार आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण व्हॅल्युऐशनसाठी पत्र पाठविले का?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–आपण व्हॅल्युऐशनसाठी पत्र पाठविले होते परंतु त्यांनी असे कळविले की, तुम्ही नवीन ॲक्ट खाली भूसंपादन करीत आहात. हे तुम्ही डेप्युटी डायरेक्टर यांच्याकडून करा अथवा व्हॅल्युऐशन डिपार्टमेंट अथवा रजिस्ट्रेशन डिपार्टमेंट यांच्याकडून करून घ्यावे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते लवकरात लवकर करून घ्यावे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–पुढील मंगळवारी आपण हा प्रस्ताव सादर करणार आहोत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–प्रस्ताव तयार करताना त्यामध्ये व्हॅल्यूऐशन नमूद करावे लागेल.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ठीक आहे, तोपर्यंत ते होईल.

मा.अविनाश बागवे–मा.सभासदाना बजेटच्या संदर्भात बोलायचे आहे आणि तसे असेल तर त्यासाठी दोन दिवसात एक वेगळी सभा, खास सभा घ्यावी.

मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, अंदाजपत्रकातील अनेक कामे अद्याप कार्यरत आहेत. त्या बाबतच्या फाईल्स टेबलवरच आहेत, त्या संदर्भात एक तातडीची सभा बोलवावी.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–कामे होत नसतील तर जबाबदारी निश्चित करावी.

नगरसचिव–मा.अध्यक्षा, खास सभेसाठी तसा प्रस्ताव द्यावा लागेल.

मा.अविनाश बागवे–समजा तसे जमले नाही तर, पुढील मंगळवारी नियमित सभेच्या एक तास अगोदर आयोजित करावी.

मा.मुकारी आलगुडे–मा.अध्यक्षा, अंदाजपत्रकाबाबतची सभा, पुढील मंगळवारी नियमित सभेच्या एक तास आधी आयोजित करावी.

विषय क्र.१९८१/ठराव क्र.१९८१

मा.स्थायी समिती ठराव क्र.१७५२ दि.८/१२/२०१५ चा ठराव रद्द करुन प्रभाग क्र. ६२ कोंढवा बु. येथे शाळा इमारतीचे उर्वरीत बांधकाम करणे (भाग–ब) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.व्हि. एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,०३,३३,५४६/– पेक्षा १८.४५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८४,२७,००६=७६ रक्कमेपर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस अशा आशयाच्या दुरुस्त विषयपत्रास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/८१७ दि. २२/१२/२०१५ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/१२/२०१५ च्या सभेत ठरले होते.)
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**संकीर्ण**

विषय क्र.१९८२/ठराव क्र.१९८२

स्थायी समिती ठ.क्र.१२८०,दि.१३/१०/२०१५ बाबत अभिप्राय व अभय योजना जाहीर करून शास्ती रकमेत सूट देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/८४३, दि.२९/१२/२०१५ चे पत्र.
यावेळी नगरसचिव यांनी शासनाचे पत्र वाचून दाखविले.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये कोणता बदल केला आहे.
नगरसचिव–निदर्शनास आणणे आणि मान्यता घेणे असे केले आहे. आपण जी विचारणा केली आहे ती निदर्शनांस आहे की, मान्यतेची आहे?
मा.सुहास मापारी,कर आकारणी प्रमुख–अनु.क्र.१ ते ३ निदर्शनास आणून देत आहोत आणि अनु.क्र.४ साठी मान्यता मागत आहोत. दंड रक्कम, थकबाकीदारांना लावणे हे सन २०१० नियम क्र.४१ मध्ये बदल झाला आहे. सुरूवातीला जी मिळकत कर थकबाकी ५० पैसे, ८ पट दरवाढ करून थकबाकीमध्ये वाढ केली जाते. दरमहा २ टक्के शास्ती लावली. सन २०१० ला नाही आणि त्यानंतर महापालिकेमध्ये लावण्यात आली यामध्ये ती रक्कम आहे. ती आज मोठी रक्कम असल्यामुळे मंजूरी, निर्णय होईल. विधी विभागाकडून अभिप्राय घेऊन नियमात तरतूद आहे. यामध्ये मा.महा.आयुक्त यांनी नियम ४१ वेगळी शास्ती, फी, वसूली खर्च, मोफत कर, अशी तरतूद असल्यामुळे मा.आयुक्त साहेबांनी मान्यता दिली आहे. १ ते ३ पट नोंद केली. मिळकत कर थकबाकी वसूल करणे. एक रक्कमेवर, दि.१ जानेवारी २०१६ अखेर भरलेला २ टक्के, प्रॉपर्टी टॅक्स ७५ टक्के मोफत देण्यास, दि.१६ फेब्रुवारी अखेर पूर्ण रक्कम भरली तर २ टक्के पैकी ५० मोफत देणे, वरील अभय योजना मंजूर करणे. ही योजना नागरीकांना माहिती होण्यासाठी एजन्सी नेमणूक करावी.

मा.अध्यक्षा, महोदया, इतर महापालिकांमध्येही अभय योजना राबविली. कल्याण महापालिकेने अशी योजना राबविली. त्यांची मोठी रक्कम अडकली होती आणि आपल्याकडे इतर कारणांमुळे पैसे भरलेले नाहीत आणि त्यांना दरमहा दंड झालेला आहे अशा मध्ये ८ लाखांपैकी २ लाख ८४ हजार लोकांनी पैसे भरलेले नाहीत. ही योजना दिली तर निश्चित मोठी रक्कम भरली जाईल आणि रिकव्हरी वाढेल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–रिकव्हरी मध्ये किती वाढ होईल?
मा.सुहास मापारी,कर आकारणी प्रमुख–२ लाख ८४ प्रॉपर्टीज आहेत. यामध्ये निवासी मिळकती २ लाख १६ हजार यांची थकबाकी ४१३ कोटी रू.इतकी आहे. एकूण निवासी मिळकत कर रक्कम ८०० कोटी रू.आहे. बिगर निवासी मिळकतदारांची थकबाकी ४५९ कोटी रू.आहे. या २ लाख ४२ मिळकतींचा आजपर्यंतचा मिळकत कर १११३ कोटी रू. आणि थकबाकीसह १९१९ कोटी रू.दिसून येत आहे. ७५ टक्के डिस्कौंट देणार आणि २५ टक्के रक्कम भरून घेणार आहोत आणि कॅलक्युलेशन केले सर्व लोकांनी कर भरला तर १३१५ कोटी रू.रिकव्हरी होण्याची शक्यता आहे.
मा.श्रीकांत जगताप–७५ टक्के कर माफ म्हणजे किती?
मा.सुहास मापारी,कर आकारणी प्रमुख–६०४ कोटी ६५ लाख.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाबद्दल आणखी माहिती द्यावी.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.
मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, मा.आयुक्त साहेब, आपण पूर्वी अभय योजना राबविली आणि आपल्याकडे मोठ्या प्रमाणात वसूली झाली आहे तशीच मिळकतकरात मोठ्या प्रमाणात वसूली होऊन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडली पाहिजे. या शहरात वस्तुस्थिती अशी आहे की, नागरीक स्वत:हून येत नाहीत. टॅक्सच्या संदर्भात मा.मुख्यसभेत मा.सभासदानी अनेक वेळेला आपली भूमिका मांडली आहे की, दुबार केलेले आहे, आकडे थकवून केले आहे. जुने वाडे, नवीन इमारती अशी स्थिती आहे. भाडेकरू रहिवासी, बिगर कमर्शिअल त्यामुळे टॅक्सेशन दोन्ही व्हायला हवे होते. प्रशासकीय तरतूद असल्यामुळे ही आकडेवाढ चुकीची नाही. ती झाली पाहिजे. ऑडीट कमिटी मध्ये माहिती सादर केली होती की, गावांचा समावेश झाल्यानंतर त्यावेळी काही मिळकतींनी भरलेले नाही. ते आता वसूली करू शकत नाहीत. जे ऑडीटच्या माध्यमातून आले ते मान्य केले. जे आता पर्यंत

अनटॅक्सेबल होते त्यांच्यासाठी ही योजना राबवावी. ही योजना राबविताना सामान्य व्यक्तींवर अन्याय होऊ नये, जे नियमाने टॅक्स भरीत आहेत त्यांच्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–बी.डी.पी.भागातील स्वतंत्र आहे का?

मा.सौ.नंदा लोणकर–जे लोक प्रामाणिक आहे त्यांच्यावर अन्याय होतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, मा.बागवे यांनी सांगितले की ज्यांचे ड्युज आहेत त्यांना निवासी करावे त्यांना कमर्शिअल करू नये आणि आपल्याकडे बी.डी.पी.मधील ज्या मिळकती स्वतंत्र आहेत त्यांना व्यापारी दराने करावे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–तिथे कमर्शिअल सुध्दा मोठया प्रमाणात आहेत. १ हजार स्के.फूटाच्या आतील आहेत त्यांनाही दिलेले नाही. तुम्ही म्हणता ते ही बरोबर आहे. एक हजार स्के.फूटापर्यंत सुध्दा कोणी कोणी दुकाने, व्यवसाय सुरू केले आहेत.

मा.अविनाश बागवे–आपल्या चुकीमुळे व्यापारी दराने आकारणी केली आहे, ती सरसकट केली आहे.

मा.अध्यक्षा–ज्या लोकांनी आतापर्यंत सुध्दा टॅक्स भरलेला नाही, ते भरतील असे करा.

मा.अविनाश बागवे–ज्यांना व्यापारी दराने आकारणी केली होती त्यांची सुध्दा वसूली केलेली नाही. सन २०१० पासून केलेले नाही.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–बी.डी.पी.मधील वगळा त्यांना चुकीचा टॅक्स लावलेला आहे. ओपन प्लॉटला सुध्दा ३ पट लावला आहे. यामध्ये टॅक्स वाढतो पण मा.अध्यक्षा, याचा काहीही उपयोग नाही.

मा.अविनाश बागवे–बी.डी.पी.ची वेगळी चर्चा करा.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्येच घ्या.

मा.सौ.मुक्ता टिळक–निवासी दर, स्थलांतरीत मध्ये करा.

मा.अविनाश बागवे–टॅक्स मधून बी.डी.पी.वगळा.

मा.अध्यक्षा–बी.डी.पी.पूर्ण विषय घ्यावा. तिथे बिल्डींग्ज आहेत त्यांना टॅक्स लावायला नको का?

मा.श्रीकांत जगताप–बांधकामे होत आहेत, त्यांचे काय?

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आपण सध्या ३ पट घेतो त्याऐवजी १ पट घ्यावे अशी उपसूचना द्यावी.

मा.महा.आयुक्त–मा.सभासद यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. नॉन रेसीडेन्शीअलची आकडेवारी १५ टक्के आहे आणि रेसीडेन्सीअलची २७ टक्के आहे.

मा.अविनाश बागवे–तुमच्याकडे यादी आहे परंतु बहुतेक केसेस मध्ये वसूली केलेली नाही ती यादी सुध्दा दिलेली आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–निवासी मिळकतकर धारकांची संख्या जास्त आहे. परंतु त्यांनी त्यांच्या बिल्डींग्ज पूर्ण न केल्यामुळे कंम्पलिशन घेतले नाही, अशा बिल्डरांवर कारवाई होत नाही आणि सर्वसामान्यांना पैसे भरावे लागतात.

मा.अविनाश बागवे–प्रशासनाने त्यांच्याकडून हमीपत्र भरून घ्यावे आणि त्यांना कंम्पलिशन द्यावे. त्या लोकांवर बोजा लावता आता त्या लोकांची परिस्थिती अशी आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–त्यामुळे नागरीक वाऱ्यावर..

मा.महा.आयुक्त–आपण म्हणता तसे होत नाही, आपण त्यांना ॲमेनेस्टी स्कीम मध्ये आणत आहोत. दोन्ही बाबवार प्रत्येकाला टॅक्स, सामान्य नागरीक टॅक्स भरतातच. जिथे विकास कामे झाली आहे आणि काही कारणास्तव आपण तिथे पोहचलो नाही. १०० टक्के सूट दिली असेल, ज्यांनी १० वर्षे काहीच नाही त्यांना १०० टक्के सूट देत नाही. तर २५ टक्के शास्ती रक्कमही मोठी असल्यामुळे त्यांना भरावी लागणार आहे. सामान्य नागरीक टॅक्स भरतात, विकास कामे झाली आहेत. काही नागरीकांचे काहीतरी कारणास्तव राहिलेला असतो. ज्यांनी १० वर्षे भरला नाही त्यांना आपण १०० टक्के सूट देत नाही तर त्यांची शास्ती रक्कम मोठी असल्यामुळे त्यांना भरावी लागणार आहे. यातील २५ टक्के भरले नाहीतर दुसऱ्या महिन्यात ५० टक्के भरावेच लागणार आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–दुबार नोंदीसाठी वेगळी मान्यता दिली आहे. सिंगल आकारणी करावी म्हणून मान्यता दिलेली आहे. या ठरावाच्या अनुषंगाने त्यांना परत कर येईल.

मा.महा.आयुक्त–शास्ती कमी करतो पुढे नेट मध्ये येतील.

मा.अविनाश बागवे–नाही होत.

मा.महा.आयुक्त–रेसीडेन्सीअल मध्ये करून असे अपेक्षित आहे की, २५० ने उत्पन्न वाढेल. दरवर्षी ते नेट मध्ये येतील.

मा.अविनाश बागवे–पैसे येणार, कलेक्शन होणार. स्थळ निरीक्षण का केले नाही?ज्यामध्ये कोर्ट मॅटर आहे ते २५ टक्के बाकीचे ७५ टक्के का घेतील? आपले लोक कुठेही येत नाहीत. इकडे जातो असे सांगतात पण ते तसे करीत नाहीत.

मा.महा.आयुक्त–आता १५ ते २० दिवस अभ्यास करून हा विषय पाठविला आहे. जे महापालिकेचे उपक्रम राबवितात त्यांना १०० टक्के सूट दिली आहे.

मा.अविनाश बागवे–हे होईल, वस्तुस्थिती वेगळी असते त्याचा अभ्यास करावा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण नागरीकांना सुविधा देतो त्या बंधनकारकच आहेत. ॲडीशनल सुविधा देता त्यामुळे टॅक्सचे कलेक्शन होणे आवश्यक आहे.

मा.सभागृहनेते–जे मोठे मोठे श्रीमंत आहेत.

मा.अविनाश बागवे–आता असे कोणीही नाही की, त्यांना टॅक्स भरणे परवडत नाही.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–गरज नाही म्हणून भरीत नाहीत, अशा श्रीमंत मिळकतकर धारकांची पाहणी करावी.

मा.श्रीकांत जगताप–१५०० स्के.फूट.

मा.अनिल राणे–अहवाल तयार करा त्यामध्ये काही अडचणी आहेत. तो अहवाल पुढील आठवड्यात तयार करावा.
मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्ष, रेसीडेन्सीअलचे परत घेत आहोत कमर्शिअलचे अे.आर.व्ही.प्रमाणे चालले तर हे १ रूपया, १ लाख रू.होईल. १ रू., १० रू.कर पर्यंत उत्पन्न रेटेबल व्हॅल्यू त्यांच्या संदर्भात अमेनेस्टी स्कीममध्ये त्यांना सहभागी करून त्यांना वगळून घेतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यांनी आतापर्यंत हे केले पाहिजे होते. नवीन मिळकती विभाजन न करता परत दाखवू नये.
मा.महा.आयुक्त–विभक्त करावयाचे एकही प्रकरण होणार नाही.
मा.अनिल राणे–अभ्यास करून रिर्पोट ठेवावा.
मा.अविनाश बागवे–आपण हे डेव्हलपर्संसाठी केले आहे का?
मा.सौ.मुक्ता टिळक–डेव्हलपर्स थकबाकीदार आहेत का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–डेव्हलपर्स असतील तर ते १० हजाराच्या आत असतील.
मा.सुहास मापारी,कर आकारणी प्रमुख–मा.चेअरमन महोदय, डेव्हलपर्संच्या नावाने फर्म, १० हजार अे.आर.व्ही असेल तर त्यांना देता येणार नाही.
मा.महा.आयुक्त– १ ते १० हजार अे.आर.व्ही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–बी.डी.पी.मधील मोकळया जागा कमी केल्या आहे का?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यांची अे.आर.व्ही.किती आहे?
मा.अविनाश बागवे–१ ते १० हजार पर्यंत.
मा.सभागृहनेते–२५ हजार पर्यंत करा.
मा.अनिल राणे–लोक रेग्युलर भरतात आणि त्यांच्यावरही कार्यवाही होते.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.महा.आयुक्त साहेबांनी डॉकेट काढावे, असे सुचविले होते.
मा.महा.आयुक्त–म्हणजेच ते पूर्ण करण्यासाठीचा हा प्रस्ताव आहे.
मा.सभागृहनेते–२५ हजार पर्यंत करा.
मा.अविनाश बागवे–पहिल्या महिन्यात ५० टक्के करा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आपण पैसे भरून घेतले तरच दोन पैसे जमा होतील. १ ते १० हजार ए.आर.व्ही.असणाऱ्या मध्ये किती प्रॉपर्टीज येतात व १ ते २५ हजार ए.आर.व्ही.असणाऱ्या किती प्रॉपर्टीज येतात?
मा.अविनाश बागवे–१५ हजार पर्यंत करा. जे पैसे गोळा होणार आहेत ते विकास कामासाठी वापरावेत पहिल्या महिन्यात ७५ टक्के सूट देत आहात त्याऐवजी ती ५० टक्के इतकी करावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.कमिशनरसाहेब, १ ते १० हजार अे.आर.व्ही.मध्ये किती प्रॉपर्टीज येऊ शकतात?
मा.अनिल राणे–हे सर्व पुढील आठवड्यात सादर करावे.
मा.अविनाश बागवे–सदरची माहिती पुढील आठवड्यात द्यावी.
मा.सभागृहनेते–या आर्थिक वर्षात वसूल झाली पाहिजे.
मा.महा.आयुक्त– प्रॉपर्टीज एकत्रित सांगतो. नॉन रेसीडेन्सीअल, १ ते १ हजार– १६००, १ ते २५००– ४०९३, ५ ते १०,०००–९८००, २५ ते ५० हजार–२६००, ५० हजार अे.आर.व्ही.च्या वर–८२९६. आपण बघितले तर २५ हजार ते ३३ हजार पर्यंत अे.आर.व्ही.असणाऱ्या प्रॉपर्टीज आहेत.
मा.सभागृहनेते–३३ हजार प्रॉपर्टीज येतील.
मा.अनिल राणे–यामध्ये तडजोड घेऊ नका.
नगरसचिव– या विषयाला उपसूचना आली आहे.

<u>उपसूचना</u>

**सूचक**–अविनाश बागवे

**अनुमोदक**–मा.राहूल तुपेरे, मा.अनिल राणे, मा.श्रीकांत जगताप, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.राजेंद्र शिळीमकर मा.सौ.आरती बाबर, मा.सौ.नंदा लोणकर

१. **कर संकलन विभागाकडून निर्देशित अभय योजना केवळ शहरातील सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरीक यांचे मिळकतीकरिता लागू करण्यात यावी.**
२. **व्यापारी प्रयोजन निश्चित असलेल्या मिळकती, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मिळकती, उच्च उत्पन्न गटातील सदनिका, हॉटेल व्यवसायिक, मंगल कार्यालये, निवासी जागेचा व्यापारी उपयोग करणाऱ्या व्यवसायिकांना ह्या योजनेतून वगळण्यात यावे.**
३. **सुसूत्रित, गतिमान करसंकलन वसूली करता फेरसर्वेक्षण व वसूली मोहिम प्रायोगिक तत्वावर खाजगीकरणाव्दारे ठराविक काळासाठी राबविण्यात यावी.**

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ही उपसूचना विसंगत आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये ऐ.आर.व्ही.नाही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यापुढील वगळण्यात यावे.

नगरसचिव–पुढचे वगळले आहे.
या प्रस्तावामध्ये बदल केला आहे. तो नवीन प्रस्ताव मी वाचून दाखवितो. आता नवीन उपसूचनेव्दारे ही दुरूस्ती केली आहे.

<u>उपसूचना</u>

**सूचक**–अविनाश बागवे **अनुमोदक**–मा.राहूल तुपेरे, मा.अनिल राणे, मा.श्रीकांत जगताप, मा.सौ.मुक्ता टिळक,मा.राजेंद्र शिळीमकर मा.सौ.आरती बाबर, मा.सौ.नंदा लोणकर

**सुसूत्रित गतिमान करसंकलन वसूली करीता फेरसर्वेक्षण व वसूली मोहिम प्रायोगिक तत्वावर खाजगीकरणाव्दारे ठराविक काळासाठी राबविण्यात यावी, र.रू.२५ हजार पुढील ओ.आर.व्ही.असणाऱ्या मिळकती वगळण्यात याव्यात.**

नगरसचिव–या उपसूचनेला, प्रस्ताव बदल दुरूस्तीला कोणाचा विरोध आहे का?
मा.अध्यक्षा–ही उपसूचना मान्य करावी.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये र.रू.२५ हजार पुढील ओ.आर.व्ही.असणाऱ्या सर्व प्रॉपर्टीज असतील.
नगरसचिव–या विषयाला दुसरी उपसूचना आली आहे.

<u>उपसूचना</u>

**सूचक**–अविनाश बागवे **अनुमोदक**–

**बी.डी.पी.झोन मधील बांधकामांना ३ पट न आकारता, १ पटीने आकारावा.**

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आपण हे करू शकतो का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये अनधिकृत बांधकामे आहेत. हा विषय स्वतंत्र आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ही उपसूचना विसंगत नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्याचा याच्याशी काहीही संबंध नाही.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हे केले पाहिजे त्यांच्यावर अन्याय करू नका.
मा.सौ.मुक्ता टिळक–असे होणार नाही, तो विषय पेंन्डींग राहिल.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–२३ गावांवर अन्याय होत आहे.
मा.सचिन दोडके–जी अनधिकृत बांधकामे आहेत त्यांना सुध्दा टॅक्स आहे. त्यामुळे त्यांचे वेगळे डॉकेट आणावे.
मा.चंदूशेठ कदम–मा.सभागृहनेते त्यासाठी वेगळे डॉकेट आणावे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये मोबाईल टॉवर येणार आहेत का? २५ हजार ओ.आर.व्ही.केली आहे.
मा.सुहास मापारी,कर आकारणी प्रमुख–त्यांची भाडेतत्वावर आकारणी केलेली असल्यामुळे..
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–याबद्दल खात्री करावी.
मा.अविनाश बागवे–यामधून मोबाईल टॉवर वगळावेत. ते सगळे २५ हजार ओ.आर.व्ही.च्या पुढे आहेत.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामधून मोबाईल टॉवर वगळावेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–तुमच्या भागात मोबाईल टॉवर नाहीत का?
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मा.नगरसचिव, यामधून मोबाईल टॉवर्स वगळावेत.
नगरसचिव–मोबाईल टॉवर्स वगळण्यात यावेत.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये बी.डी.पी.चा विषय आणला, शास्तीचा विषय आणला या योजनेमध्ये हे सक्तीचे आहे का? आपण अंमलबजावणी करणार आहे का?
मा.अविनाश बागवे–शहरामध्ये बी.डी.पी.आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–बी.डी.पी.चा विषय वेगळा आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय वेगळा का?
मा.अविनाश बागवे–हा विषय स्वतंत्र घ्यावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय पुढील वेळेस आणावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–सर्व सभासदाच्या भावना लक्षात घेऊन हा विषय पुढील मंगळवारी आणावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–आताचा हा विषय मान्य करावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय आजच मान्य करू परंतु बी.डी.पी.मधील मिळकतींना एकपट मिळकत कर आकारावा, हा विषय पुढील मंगळवारी आणावा.
मा.अनिल राणे–आताचा हा विषय कोणाचा होता तो मा.सभासदाचा प्रस्ताव होता आणि या आधीचा विषय प्रशासनाने दिला होता तो प्रशासनाचा प्रस्ताव मंजूर करावा.
नगरसचिव–होय तो प्रशासनाचा विषय आहे.

मा.अनिल राणे–मा.सभासद यांनी दिलेला प्रस्ताव अभिप्रायसाठी पाठवावा किंवा तो मागे घ्यावा. तो या विषयामध्ये घेतलेला नाही.

अविनाश बागवे –ठीक आहे, तुमच्या प्रमाणे पूर्वीचेच ठेवा.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ही दुसरी उपसूचना पुढील सभेत देणार आहात का?

मा.अध्यक्षा–तो विषय येऊ द्या. मग ही दुसरी उपसूचना घ्यावी.

अविनाश बागवे –आम्ही आमची उपसूचना मागे घेतो.

नगरसचिव–आता एकच उपसूचना आहे. उपसूचनेसह दुरूस्त प्रस्तावाला कोणाचा विरोध आहे का?

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते, उपसूचनेसह मान्य, आणि दि.११ जानेवारी २०१६ ते १० फेब्रुवारी २०१६ पर्यंत ७५ % सूट व दि.११ फेब्रुवारी २०१६ ते दि.११ मार्च २०१६ पर्यंत ५० % सूट याप्रमाणे मान्य करण्यात आले.**

नगरसचिव–मी फक्त एक बाब निदर्शनास आणतो की, आता आपण जो अभय योजनेचा विषय केला आहे त्याच्या फक्त तारखा चेंज कराव्या लागतील. त्यांनी १ जानेवारी तारीख मागितली होती आणि आता मा.आयुक्त साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ११ जानेवारी २०१६ आणि ११ फेब्रुवारी २०१६ याप्रमाणे करू या.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ठीक आहे, त्यामध्ये त्यांनी तसे म्हंटले होते.

विषय क्र.१९८३/ठराव क्र.१९८३

सन २०१५–१६ टेंडर क्रमांक ३ मधील मान्य ठेकेदाराकडून मान्य दराने वाढीव औषंधाची खरेदी करणेसाठी **१.** प्रकाश मेडिको **२.**फार्मासिया लिंक **३.** श्री विनायक फार्मा. **४.**गेटवेल डिस्ट्रीब्युटर्स ५.नेहा एंटरप्राईजेस ६. ओसवाल एंटरप्राईजेस ७. कृपा ८. अंबिका ड्रग हाउस ९. ओम शांती एंटरप्राईजेस १०. ऑस्टिन हेल्थ केअर ११. लक्ष्मी मेडिकल्स १२. आकाश मेडिकेअर या बारा पुरवठाधारकांकडून खात्याच्या आवश्यकतेनुसार रक्कम रू.१,२९,४१,०००/– पर्यंत औषधे खरेदी करण्यास व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व औषधे खरेदी बिलांच्या परिपूर्तीसाठी खालील नमुद केल्याप्रमाणे रक्कम रू.१,२९,४१,०००/– पर्यंत वर्गीकरणाने उपलब्ध होण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र.म.आ./आरोग्य/८४५, दि.३०/१२/२०१५ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका | | |
| १. ७ क रूग्णालये प्र.गृह औषधालये इ. RE17D118 पुणे शहरातील जन्म झालेल्या बालकांच्या पालकांना घरपोच जन्म दाखले देणे. | ९२१००० | --- |
| २. RE17F147N जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत मोफत औषधे तपासणी पौष्टभक आहार व वाहन व्यवस्था देणे. | ४०८०००० | --- |
| ३. ७क रूग्णालये प्र.गृह औषधालये इ. RE17F191 कमला नेहरू रूग्णालय येथील अतिदक्षता विभागाकरीता दैनंदिन वापरासाठी औषधे व इतर साहित्य ( कंझुमेबल ) खरेदी करणे. | ५४४०००० | --- |
| ४. RE17F192 कमला नेहरू रूग्णालय येथील तज्ञ ( बॉडेड ) स्पेशालिस्ट व सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या एकवट वेतनापोटी. | २५००००० | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका , ७क. रूग्णालये प्र.गृह.औषधालये इ. RE17F133 , ४.औषधे व उपकरणी | --- | १२९४१००० |

मा.सौ.मुक्ता टिळक–या वर्षात नागरीकांना घरपोच दाखले देणे झाले नाही का?

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

अशा पध्दतीने सभा समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**